www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

दैं. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग
खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर,
अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर
प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 196 वा बुधवार दि. 02 एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

द • ख • ल

## मोफत डोळे तपासणी आणि मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

३१ मार्च रोजी नायर सुपर स्पेशालिटी आय हॉस्पीटल आणि ग्रुप ग्रामपंचायत उमरोली यांच्या सहकार्याने रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उमरोली येथे मोफत डोळे तपासणी आणि मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित केले होते. यावेळी ग्रुप ग्रामपंचायत हद्दीमधील ५० पेक्षा जास्त नागरिकांनी या शिबिरात भाग घेऊन मोफत तपासणी केली असून मोतीबिंदू आढळलेल्या नागरिकांचे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया होणार आहे.

यासोबत ग्रुप ग्रामपंचायत उमरोली यांच्याकडून आयुष्मान भारत कार्ड बनवून देण्याचे काम हाती घेतले आहे. तरी गावातील सर्व लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे सरपंच यांनी सर्व नागरिकांना आवाहन केले आहे. यावेळी भारतीय जनता पार्टीच्या ग्रुप ग्रामपंचायत उमरोलीच्या श्वेता हनुमान माळी ( सरपंच, उमरोली), शांताराम पोपेटा (माजी सरपंच), नारायण माळी, नारायण मढवी, हनुमान माळी, भोलेनाथ जगताप ( ग्रामपंचायत अधिकारी- उमरोली) इत्यादी मान्यवर उपस्थित होते.




## डंपरच्या धडकेने कामगाराचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** डंपरच्या धडकेने एका कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना गव्हाण फाटा परिसरात घडली आहे. सदर ठिकाणी काम चालू असलेल्या साईटवर गव्हाण फाट्याजवळील जुना रोडवर चंदन जगबहादूर राम (31) सदर ठिकाणी हा काम करीत असताना मातीचा भराव करण्यासाठी माती भरुन आलेल्या डंपरवरील चालकाने तो चालवित असलेला डंपर हा माती टाकण्यासाठी पाठीमागे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अविचाराने जोरात रिव्हर्स चालवित घेत असताना सदर डंपरची धडक या कामगाराला बसल्याने त्यात तो जमिनीखाली पडून सदर मातीने भरलेल्या डंपरचे चाक त्याच्या अंगावरुन गेल्याने त्यात तो दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## शालिनी सोपानराव तोगरे (घाटे) यांना मिळाला गुणवंत शिक्षकाचा बहुमान...

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना (अशोक ठोके)**

आंबा,ता.परतूर,जी.जालना येथील जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका श्रीमती शालिनी सोपानराव तोगरे (घाटे) यांना महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद जिल्हा जालनाच्या वतीने "गुणवंत शिक्षक पुरस्कार" देण्यात आला आहे.जालना चे विद्यमान आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते शाल,श्रीफळ व ट्रॉफी देऊन नुकताच त्यांचा गौरव करण्यात आला आहे.या कार्यक्रमाच्या वेळी बदनापूर चे आमदार नारायण कुचे, शिक्षण अधिकारी, माजी नगराध्यक्ष आंबेकर यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या पुरस्काराबद्दल त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक पतंगराव सर, मगर सर शालेय समिती अध्यक्ष घुले सर,कृष्णाजी भदर्गे यांनी त्यांचं अभिनंदन केले आहे




# HINCOL कंपनीतर्फे डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेला इको गाडी भेट








**दैनिक युवक आधार**
**भारती आमले**
**मुख्य संपादक**

शिक्षणासाठी एक पाऊल पुढे येत
दिनांक 28/03/ 2025 रोजी हिंदुस्तान कोलास प्रायव्हेट लिमिटेड कंपनी (तुर्भे) यांच्यातर्फे डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत स्मार्ट क्लास व ईको गाडीचे हस्तांतरण करण्यात आले.
या कार्यक्रमांमध्ये हिंदुस्तान कोलास लिमिटेड कंपनी चे.श्री अद्वेश सिंग कुशवाह (रिजनल बिजनेस हेड),श्री. हरेंद्र सिंग (प्लांट मॅनेजर) श्री .दिगंबर कोहले(सीनियर साईट सर्विसेस) , श्री. सुधाकर सानप ( प्लांट कमर्शियल)श्री. प्रदीप सिंग (प्लांट अकाउटंट),श्री. दिलीप परेरा (एच आर असिस्टंट ),डॉ.नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन चे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ.श्री. नंदकुमार मारुती जाधव सर,संस्थेचे सचिव श्री. सुरेश जाधव सर, संस्थेचे खजिनदार श्री.अतुल वाणी सर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.श्रेया जाधव मॅडम शाळेतील विद्यार्थी,शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी, पालक उपस्थित होते.

हिंदुस्तान कोलास प्रायव्हेट लिमिटेडचे अधिकारी वर्ग यांनी शाळेस भेट दिली. शाळेत चालणारे कामकाज पाहिले. सी. एस. आर प्रोजेक्ट अंतर्गत शाळेसाठी एक स्मार्ट क्लास यांच्यातर्फे बनवून देण्यात आला .तसेच विद्यार्थ्यांना शाळेत ने - आण करण्यासाठी इको गाडी शाळेला दिली .
पाहुण्यांचे स्वागत विद्यार्थ्यांनी बनवलेले पुष्पगुच्छ व व्यावसायिक वर्गातील विद्यार्थ्यांनी बनवलेल्या वस्तू गिफ्ट बॅग मधून देण्यात आल्या. विदयार्थ्यांनी पाहुण्यांसमोर स्वागत गीत व नृत्य सादर केले. कंपनीचे रिजनल बिजनेस हेड श्री .अद्वेश सिंग कुशवाह व श्री. दिगंबर कोहले (इंजिनिअर साईट सर्विसेस) यांनी मनोगत व्यक्त करताना शाळेच्या कामकाजाचे कौतुक केले .
व यापुढेही सहकार्य दिले जाईल असे आश्वासन दिले. आभार प्रदर्शनाच्या कार्यक्रमानंतर कार्यक्रम संपन्न झाला.

## उरणमधील गुढी पाडव्याच्या शोभा यात्रेने वातावरण मंगलमय आणि आनंदी.

**दैनीक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू धर्मातील गुढी पाडवा होय.त्यामुळे या सणाच्या नववर्षाच्या स्वागतासाठी हिंदू धर्माचे पावित्र्य राखण्यासाठी, वर्षाची सुरूवात आनंद आणि उत्साहाची,आरोग्याची गुढी उभारून करतात. उरण मध्येहि या नवीन वर्षाची सुंदर अशा शोभायात्रेने करण्यात आली. उरण मध्ये जेष्ठ नागरिक यांच्या पुढाकाराने व सकल हिंदू समाज उरणच्या वतीने भव्य दिव्य अशी शोभा यात्रा काढण्यात आली. चैत्र शुक्ल १, प्रतिपदा शके १९४६ हिंदू नव वर्ष दिन रविवार दिनांक ३० मार्च २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता महाराष्ट्र भूषण डॉ नानासाहेब धर्माधिकारी शाळा पेन्शनर्स पार्क उरण शहर, गणपती चौक, राजपाल नाका, विमला तलाव, एन आय हायस्कूल, डॉ नानासाहेब धर्माधिकारी शाळा पेन्शनर्स पार्क या मार्गावर शोभा यात्रा काढण्यात आली. या शोभयात्रेत सर्वच स्तरातील, विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते. वादन एक कला ढोल ताशा पथकाच्या ढोल ताशाने उरण परिसरातील वातावरण दुमदुमून गेले होते. शोभायात्रेत पारंपरिक भजन, एन आय हायस्कूल शाळेचे लेझिम पथक व महिलांनी काढलेल्या बाईक रॅली, लहान मुलांची ऐतिहासिक वेशभूषा,महिलांची पारंपरिक वेशभूषा,यामुळे शोभायात्रेचा देखावा नयनरम्य असा दिसत होता. विविध मर्दानी खेळ व साहसी खेळ दाखवून विद्यार्थ्यांनी सर्वांची मने जिंकली. त्याचप्रमाणे ते खेळ पाहून मनात चैतन्य निर्माण झाले. या शोभा यात्रेत विविध वेशभूषा परिधान करून सर्व गटातील नागरिक सहभागी झाले होते. या शोभा यात्रेसाठी प्रमुख पाहूणे म्हणून उरण विधानसभा मतदार संघांचे आमदार महेश बालदी उपस्थित होते. या शोभयात्रेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, एन आय हायस्कूल उरण, कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय उरण, आर्ट ऑफ लिविंग उरण , उरण महिला सामाजिक शैक्षणिक संस्था उरण, वुमन क्लब उरण,माई फॉउंडेशन उरण,अरीत फॉउंडेशन उरण, कुटुंबिनी महिला संघ उरण, मी उरणकर ढोल ताशा पथक उरण, वादन एक कला ढोल ताशा पथक, सद्‌गुरू श्री अनिरुद्ध उपासना केंद्र उरण, सद्‌गुरू श्री नरेंद्र महाराज उपासना केंद्र उरण, इस्कॉन संघटना उरण, वारकरी संप्रदाय उरण, उरण तालुका मराठी पत्रकार संघ, कै आश्विन पाटील मित्र मंडळ उरण,योगा विथ पूनम ग्रुप,उरण सामाजिक संस्था, उरण मधील विविध सामाजिक संस्था संघटना आदी संस्था संघटनेचे पदाधिकारी सदस्य शोभायात्रेत मोठया संख्येने उपस्थित होते. अशी हि विलोभनीय शोभायात्रा पाहून खरच एक प्रकारचे चैतन्य उत्साह निर्माण झाला सर्वत्र आनंदी वातावरण दिसून येत होते.




# ग्राममहसूल अधिकारी तथा तलाठी गणेश गोराडे हे सेवानिवृत्त,उपविभागीय अधिकाऱ्यांनी केला सत्कार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** सिल्लोड तहसील कार्यालयातील ग्राममहसूल अधिकारी गणेश गोराडे हे दि. ३१मार्च रोजी सेवानिवृत्त झाले असून त्यांचा उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण यांच्या हस्ते शाल पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. निल्लोड ता. सिल्लोड येथील गणेशराव फकिरराव गोराडे हे सोयगाव कन्नड आणि सिल्लोड आदी तहसील कार्यालयातील महसूल विभागाच्या ग्राममहसूल अधिकारी तथा तलाठी पदावर २५ वर्ष सेवा करून ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त झाले असून त्यांचे सिल्लोड तहसील कार्यालयात




उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, तहसीलदार संजय भोसले यांनी गोराडे यांना शाल पुष्पहार घालून सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांना सेवानिवृतीनंतरचे पुढील आयुष्य चांगले, आरोग्य, सुख-समृद्धी, समाधान, आनंदात जावो.अशी शुभेच्छा यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी दिल्या. याप्रसंगी नायब तहसीलदार बळीराम मुंडे,नायब तहसीलदार हारूण शेख, विजयमाला पुपलवाड, रूपाली सराफ, सेवानिवृत्त नायब तहसीलदार प्रभाकर गवळी, जिल्हा ग्राम महसूल अधिकारी संघाचे कार्याध्यक्ष दगडू जरारे, संघटक, आप्पासाहेब सोनवणे,
ग्राम महसूल अधिकारी संघाचे तालुका अध्यक्ष रवींद्र कुलकर्णी, सचिव काशिनाथ ताठे, व मंडळ अधिकारी प्रभाकर चव्हाण, आप्पासाहेब सोनवणे, शिवाजी सपकाळ, विजय शेळके, भगतसिंग पाटील, शंकर जयस्वाल, चांदे ग्राममहसूल अधिकारी महिला, कालिंदी पाटील, सुनिता गरुड, रुखमन माने, प्राजक्ता आंबुसकर, प्राप्ती चांगडे, रत्ना चेंडोल, विशाल दुणगहु, समाधान जुंबड, किरण तायडे , विजय राठोड, विकास कापसे, विष्णू गवळी अनिकेत वाघ, दीपक बागुल, अशोक निकाळे संतोष इंगळे, प्रशांत देवगय्या, अंकुश साबळे, विष्णू सोनवणे, परमेश्वर ढेपले कृष्णा पायगव्हाण, कृष्णा देशमुख, गणेश फरकाडे जयंत घोडके,
तहसील कर्मचारी शिवाजी सोनवणे,आशिष औटी, संतोष राठोड, स्वाती म्हळसने, पदमा तायडे, देविदास भोरकडे, राजू बसयै, नबी शहा, व सर्व तलाठी व कर्मचारी उपस्थित होते.

## हिंदू नववर्ष गुढीपाडवा निमित्त नववर्ष स्वागत समिती विचुंबे, देवद व उसर्ली यांच्यावतीने भव्य शोभायात्रा








**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

हिंदू नववर्ष गुढीपाडवा निमित्त नववर्ष स्वागत समिती विचुंबे, देवद व उसर्ली यांच्यावतीने भव्य शोभायात्रा आयोजित करण्यात आली होती. यावेळी सरपंच प्रमोद भिंगारकर, उपसरपंच रवींद्र भोईर जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष किशोर सुरते माजी ग्रामपंचायत सरपंच बळीराम पाटील, ग्रामपंचायत सदस्य अनिल भोईर, भरत पाटील, अनंता गायकवाड, आनंद गोंधळी, विभूती सुरते, प्रगती गोंधळी, श्रावणी भोईर, आरती गायकवाड, गुरुनाथ म्हात्रे, प्रमिला म्हात्रे, ग्रामस्थ व विविध सोसायटीचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. यावेळी महिला, युवक-युवतींची उपस्थिती लक्षणीय होती.

# गुड लाईफ आरोग्य केंद्रामध्ये गुढीपाडवा उत्सहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**

दिनांक ३० मार्च २०२५ रोजी गुढीपाडवा दिनानिमित्त भारतीय संस्कृतीचा आणि प्राचीन वारसा म्हणून हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी महाराष्ट्रात गुढीपाडवा हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो मूळ संस्कृतीचा अभिमान रुजवण्यासाठी महिला व पुरुष विविध पद्धतीने नटले जातात आणि आपल्या घराजवळ गुढी उभी करण्यासाठी चौरंग कलश नारळ आंब्याची डहाळी कडुलिंबाची डहाळी गोड मिठाची गाठी नवी करकरीत साडी व पुरणपोळी नैवेद्य ठेऊन आपल्या घरासमोर गुढी उभी करुन पूजा करून नवीन वर्षाचे स्वागत करतात हा नवीन वर्ष सर्वांना सुखाचा समृद्धीचा भरभराटीचा आनंदमय व आरोग्यमय जावो अशी प्रार्थना करुन एकमेकांना शुभेच्छा दिल्या जातात. आज रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर

नवीन पनवेल येथील गुड लाईफ आरोग्य केंद्रमध्ये सर्वांना आरोग्याची काळजी आणि दैनंदिन आहार कसे सेवन केले पाहिजे याचे मौलाचे मार्गदर्शन केले यावेळी केंद्राचे संचालकआरोग्य सलगार परसराम बजंत्री व त्यांची पत्नी हर्षला परसराम बजंत्री यांची कन्या निलया परसराम बजंत्री हिचा वाढदिवस आज गुड लाइफ आरोग्य केंद्रमध्ये साजरा करण्यात आला यावेळी आरोग्य सल्लागार विनोद सोळंकी नीता सोळंकी गजानन कदम चंदा चौरसिया किरण सिंग उजाला शर्मा राहुल पाल प्रसाद काटे प्रिया बजंत्री अनिल कदम अनिता कदम अभिजीत मोहिते महेंद्र पवार आरती पाटील वंदना चंदनशिवे सपना पाटील कैलास डाकी वनिता डाकी युथ महाराष्ट्र संपादिका दिपाली पारसकर क्षितिज पर्व संपादक सनीप कलोते पत्रकार किरण बाथम व दैनिक युवक आधारचे कार्यकारी संपादक सुरेश भोईर रंजना भोईर नयन भोईर संदीप भोईर आरती भोईर गीता भोईर तसेच गुड लाईफ केंद्राचे आरोग्य सल्लागार सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.











# मुरबाड तालुक्यातील न्हावे सासणे येथे श्री राम नवमी निमित्त अखंड हरीनाम सप्ताह चे आयोजन .

**दैनिक युवक आधार**
**ठाणे प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील मौजे न्हावे येथे सतत १३ वर्षे श्रीराम नवमी निमील अखंड हरीनाम सप्ताहाचे ४ एप्रील ते ७ एप्रील या कालावधीत अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते आहे यात हभप भाग्य श्री ताई भाग्यवंत . हभप धनाजी महाराज हभप योगेश लांबे महाराज . हभप आरतीताई शिंगोळे या नामवंत किर्तनकारांची किर्तने आयोजित केली आहे तसेच रामविजय ग्रंथाचे पारायण हरीपाठ भजन हे सतत तिन दिवस चालणार आहे . . या सप्ताहाला आनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत . या कार्यकमाचे संयोजन लोकमित्र रमेश हिंदुराव हे १३ वर्ष करीत आसुन या अमृत पर्वाचा सर्वांनी लाभ घ्यावा . व तन मन धनाने या सप्ताहात मदत करावी असे आवाहन रमेश हिंदुराव यांनी केले आहे .

# पनवेल वाहतूक पोलिसांची रिक्षा टॅक्सी कार वर दंडात्मक कारवाई

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**
**संपादक**

पनवेल शहरातील वाहतूक पोलिसांनी आज एक मोठी कारवाई करत रिक्षा टॅक्सी आणि कार वर दंडात्मक कारवाई केली. शहरातील विविध भागांमध्ये वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा टॅक्सी व कार चालकांवर कठोर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी विशेष चेकिंग ड्राइव्ह सुरू करत वाहनांवर अवैध पार्किंग वाहतुकीचे नियम तोडणे या सारख्या नियमभंगावर कारवाई केली. यामध्ये रिक्षा चालकांनाही लक्षात घेत पोलिसांनी अधिक कठोरपणे कारवाई केली आहे. पनवेल पोलिस वाहतुक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी सांगितले की, "शहरात वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी व त्यात सुधारणा करण्यासाठी अशी कार्यवाही पुढेही सुरू राहील. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना दंड ठोठवून तसेच योग्य शिक्षा देऊन शहरात वाहतूक सुरक्षा वाढवणे हे आमचे उद्दिष्ट आहे."

कारवाईत सुमारे 58 वाहन चालकांना दंड ठोठवण्यात आले, तसेच काही वाहनांच्या कागदपत्रांची तपासणी देखील करण्यात आली

चालकांनी वाहतुकीचे नियम पाळावे असे पनवेल वाहतूक विभाग वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी नागरिकांना आवाहन केले.





# राळेगाव शहरात हिंदू नववर्ष निमित्त मातृशक्तींची बाईक रैली

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**

राळेगावः- शहरात प्रथमच संस्कृति जपण्यासाठी हिंदू नववर्ष दिन साजरा करण्यात आला.राळेगाव शहरातील काही मातृशक्तीनी कमी कालावधीत बाईक रैली चे आयोजन केले.या रैली साठी महिलांनी आनंदाने स्फुर्तीने अगदी कमी वेळात सहभाग घेतला.या रैली चे मुख्य आकर्षण म्हणजे पाच ते नऊ वर्षांच्या मुलींच्या हाताने बाईक रैली ला भगवा झेंड़ा दाखवुन रैलीची सुरुवात करण्यात आली.त्यात मुख्यतःथोर पुरुषांच्या पुतळ्याला माल्यार्पण करुन छत्रपती शिवाजी महाराज,वीर भगतसिंग,बिरसा मुंड़ा,बाबासाहेब आंबेडकर व गाड़गेबाबा यांच्या पुतळ्यास माल्यार्पन करुन अभिवादन करण्यात आले.तसेच भारत माता कि जय , वंदेमातरम्, छत्रपती शिवाजी महाराज की जय मां जिजाऊ कि जय प्रभु श्रीरामाच्या नावाचा जयजयकार करण्यात आला.यावेळी लहान मुलींच्या हस्ते ही थोर पुरुषांच्या पुतळ्यांना हार टाकण्यात आले.हि रैली राळेगाव च्या मुख्य रस्त्याने जावुन,समारोप श्रीराम मंदीर येथे करण्यात आला.ह्या आकर्षक कार्यक्रम समारोपाचे मुख्य पाहुणे डॉ.कृष्णा गोपालजी मश्रु,डॉ. सौ.अश्वीनी अशोकजी थोड़गे,सौ.शशि अनिलजी वर्मा,ह्या मंचावर उपस्थित होत्या.कार्यक्रमासाठी मातृशक्ती ,मुली मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कु.सान्वी कामड़ी,कु.शौर्या पटेलपैक,कु. दिया मश्रु,कु.श्रध्दा ताड़ेराव,सौ. प्रणाली धुमाळ,सौ.राजश्री सिड़ाम,सौ. सोनाली इंगळे,सौ.विजया ढ़गे,सौ. शुभाग़ी पटेलपैक ,सौ.ज्योती कारिया ,सौ.संध्या मश्रु,कु.लीना कारिया ,सौ. स्वाती निंबुळकर,सौ.मेधा देशमुख ,सौ.जोत्सना सोनटक्के,सौ.शितल देवतळे,सौ.सिमा येड़स्कर,सौ.शितल राऊत,श्रीमती करुणा वानखेड़े,सौ. सोनम नारनवरे,सौ.जयश्री कोल्हे,सौ. निलीमा पोंगड़े,सौ.अर्चना पावड़े,सौ. निशा पाटील ह्यांनी सहभाग घेतला ह्या कार्यक्रमासाठी मातृशक्तीनी मोठ्या प्रमाणावर हजेरी लावली कार्यक्रम शांततेने पार पड़ला .ह्या कार्यक्रमात मॉ जिजाऊ,झांशीच्या राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर अशा विविध वीरांगना विषयी विशेष महत्व यांची सविस्तर माहिती डॉ.सौ.अश्वीनीताई थोड़गे यांनी सांगितले, डॉ.कृष्णाताई मश्रु ह्यांनी महिलांना एकजुट आणि संगठन चे महत्व सांगितले,संचलन अँड रौशनी कामड़ी यांनी केले, प्रास्ताविक आणि गुड़ी पाडव्याचे महत्व,नवरात्र, महाराष्ट्राचा पेहरावा नववारी पातळ चे महत्व सौ.भावनाताई खंगन ह्यांनी समजावुन सांगीतले.,समाजात घड़त असलेल्या विविध विषयांवर थोड़क्यात माहिती देताना सामाजिक कार्यकर्ता सौ.संतोषीताई वर्मा ह्यांनी सांगितले मुली समाजाच्या भविष्य आहेत,ह्यांना रिल ची राणी न करता ह्यांना झाशीच्या राणी सारखं तयार करणे हि काळाची गरज आहे.

कार्यक्रमाचे आभार सौ.रौशनीताई ह्यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीराम मंदीर समिती,श्री. छत्रपति शिवाजी महाराज जन्मोत्सव समिति ह्यांनी सहकार्य केले. भगवे झेंड़े आणि फेटे गोपाल मश्रु आईस्क्रीम अड.प्रितेश वर्मा आणि महत्वाचे सहकार्य राजनारायण/पारस वर्मा,विनोद क्षीरसागर,पटेलपैक भाऊ,अशोक कोल्हे ह्यांनी मोलाचे सहकार्य राळेगाव शहराचे ठाणेदार सिताराम म्हैत्रे ,विशाल बोरेकर, युवराज पाईकराव ,रुपेश जाधव ,सौ. प्रियाताई बोरेकर,एंड्रेसकर सर आणि इतर पोलीस कर्मचारी... आयोजक स्वामी विवेकानंद विचार मंच,नशा बंदी मंडळ महाराष्ट्र राज्य.श्रेष्ठा सम्पूर्ण भारतीय मैढ़ क्षत्रिय स्वर्णकार समाज महिला मंडळ दिल्ली पंजीकृत-२६२/२०२४--महाराष्ट्र राज्य ,अखिल भारतीय महिला संरक्षण संस्था ह्यांच्या सहकार्य ने ह्या हिंदू नववर्ष निमित्त बाईक रैली कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.



## "जमाखर्च जीवनाचा"

वर्तुळरूपी जीवनाचा जमाखर्च मांडतांना....

सुखाची बेरीज करित असतांना,
दु:खाची वजाबाकी विसरू नका!
यशाचा गुणाकार करतांना,
अपयशाचा भागाकार विसरू नका!!

वर्तुळरूपी जीवनाचा जमाखर्च मांडतांना...

पुण्यकर्माचा वर्ग करतांना,
दुष्कर्माची वर्गमुळे काढत जा!
श्रीमंतीचा परीघ मोजतांना,
गरीबीची त्रिज्या शोधित जा!!

वर्तुळरूपी जीवनाचा जमाखर्च मांडतांना....

अखंड जीवनरेषेचा प्रवास करतांना,
प्रत्येक बिंदुला मोजत जा!
नात्याचे समीकरण सोडवितांना,
प्रयत्नांचे उतर पहात जा!!

वर्तुळरूपी जीवनाचा जमाखर्च मांडतांना...

सुत्राचा आधार घेत असतांना,
विश्वाची रहस्ये उलगडीत जा!
स्वप्नांच्या प्रमेय सिद्धांत मांडतांना,
मनातले कोडे सोडवित जा!!

वर्तुळरूपी जीवनाचा जमाखर्च मांडतांना....

तुमचा लसावी - मसावी जरी शुन्य आला तरी,
आयुष्यात सतकर्माचा विडा उचलत जा!
कारण जीवनाच्या गणितात प्रयत्नच अंतिम सुत्र असते,
हे सगळ्यांच्या मनात बिंबवत जा!!

**.पो. पिंपळनेर( गोपाल नगर) ता. साक्री जि. धुळे**

# राळेगाव नगरपंचायतीच्या अतिक्रमण हटवण्याच्या कारवाईत बेकायदेशीर वृक्षतोड!


## परवानगी न घेता झाडाची कत्तल कायदेशीर कारवाई होणार का?

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ प्रतिनिधी**
**:जितेंद्र खोडे**

**राळेगावः**-येथील गेल्या आठवड्यात (दि.२८ मार्च २०२५) राळेगाव नगरपंचायतीने अतिक्रमण हटवण्याची मोहीम सुरू केली होती. मात्र, या मोहिमेदरम्यान एक मोठे वादग्रस्त पाऊल उचलण्यात आले बेकायदेशीर वृक्षतोड करण्यात आली असून मिळालेल्या माहितीनुसार, अतिक्रमण हटवताना नगरपंचायत अधिकाऱ्यांनी एका मोठ्या झाडाची कत्तल केली, आणि विशेष म्हणजे, त्यासाठी कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आली नव्हती. महाराष्ट्र सरकारने 2024 मध्ये झाडे तोडण्याबाबतचा कायदा अधिक कठोर केला असून, परवानगीशिवाय झाड तोडल्यास ₹50,000 दंडाची तरतूद आहे. परंतु, राळेगाव नगरपंचायतच्या अधिकाऱ्यांनी हा नियम धाब्यावर बसवत ही कारवाई केल्याचे समोर आले आहे. हा प्रकार समजताच पर्यावरण प्रेमींमध्ये नाराजीचा सूर उमटू लागला आहे. काही स्थानिक नागरिकांनी याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

"अतिक्रमण हटवणे योग्य आहे, पण झाडांची नासधूस करून कायद्याचे उल्लंघन करणे हे चुकीचे आहे," असे स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे. नगरपंचायत अधिकाऱ्यांवर किंवा झाड तोडणाऱ्यावर कारवाई होणार का?

पर्यावरण विभाग आणि स्थानिक प्रशासन यावर काय भूमिका घेणार? झाडे तोडल्याबद्दल ₹50,000 दंडाची तरतूद असतानाही जबाबदार अधिकाऱ्यांना शिक्षा होईल का? नगरपंचायत अतिक्रमण हटवण्यासाठी न्यायालयाच्या आदेशावर काम करत असली, तरी कायद्याचे उल्लंघन करून झाडे तोडणे हा गंभीर मुद्दा आहे. या प्रकरणात प्रशासन कोणती भूमिका घेते आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल!






# महापालिकेच्यावतीने एमजीएम इन्स्टिट्यूटच्या प्रोस्थेटिक्स अँड ऑर्थोटिक्स विभागाच्यावतीने हवामानातील बदलावर परिसंवादाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियान 5.0 अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये बिंबवण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच एमजीएम इन्स्टिट्यूटच्या प्रोस्थेटिक्स अँड ऑर्थोटिक्स विभागामध्ये 'हवामानातील बदल' या विषयावरती परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.




पर्यावरणाचे महत्व शालेय विद्यार्थ्यांना व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना समजावे यासाठी उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनूसार महापालिकेच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत स्वच्छ भारत अभियान व आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्वाच्या घटकांनूसार नुकतेच महापालिका व एमजीएम इन्स्टिट्यूटच्या प्रोस्थेटिक्स अँड ऑर्थोटिक्स विभाग यांच्यावतीने परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पर्यावरणाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी यासाठी ग्लोबल वॉर्मिंग, कार्बन फूटप्रिंट कमी करणे, हवामानाचे बदलाचे होणारे परिणाम व त्यावरील उपाय योजना अशा विविध विषयांवरती या परिसंवादात चर्चा करण्यात आली. तसेच महापालिकेच्यावतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण यावेळी करण्यात आले.

माझी वसुंधरा अंतर्गत राबविण्यात आलेल्या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ.निर्मल कासेकर, प्राध्यापक वंदना काला यांचे सहकार्य लाभले. यावेळी एमजीएम इन्स्टिट्यूटच्या प्रोस्थेटिक्स अँड ऑर्थोटिक्स विभागाचे व एमजीएम स्कूल ऑफ फार्मसी चे विद्यार्थी उपस्थित होते.

# आण्णा साळवे समाजभूषण पुरस्काराने सन्मानित.

## राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान.

**दैनिक युवक आधार**
**गौरव खरे**

**प्रतिनिधी मुरबाड.-** ठाणे जिल्ह्यातील आंबेडकर चळवळीचे लढाऊ नेतृत्व, अन्यायाविरोधात आवाज उठणारे, शोषित पिडीत यांना न्याय देणारे, पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे,अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे, तसेच संविधान हक्क परिषदेचे जिल्हाध्यक्ष, सार्वभौम राष्ट्र वृतपत्राचे पत्रकार आण्णा साळवे यांच्या सामाजिक,धार्मिक सांस्कृतिक राजकीय क्षेत्रातील कार्याची दखल घेत त्यांना मंत्रालय वार्ताचे संपादक अनिल आहिरे, आणि पुरस्कार निवड समितीच्या अध्यक्षा निशाताई भगत यांनी मंत्रालय वार्ताच्या "समाजभूषण" जाहीर करुन दिनांक २९/०३/२०२५ रोजी पुरस्कार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, तसेच माजी केंद्रीय कृषिमंत्री मा शरदचंद्र पवार साहेब यांच्या शुभहस्ते, शाल,श्रीफळ, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृह येथे सन्मानित करण्यात आले.या त्यांच्या निवडीने सर्वचं स्तरातून आण्णा साळवे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी




खासदार चंद्रकांत हंडोरे उपस्थित होते तर या कार्यक्रमासाठी प्रवक्ता राष्ट्रवादी काँग्रेस महेशजी तपासे, महागायक विष्णू शिंदे,रिपाई नेते अण्णासाहेब रोकडे डॉ संजीवनी कांबळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. . आंबेडकर चळवळीतील युवा नेतृत्व आण्णा साळवे हे ठाणे जिल्ह्यातील हुशार, उचशिक्षित, डॅशिंग, निर्भीड असं व्यक्तिमत्व म्हणून परिचित आहेत. आण्णा साळवे यांनी आजपर्यंत अनेक समाज उपयोगी कामे केली आहेत, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर,यांचे जयंती महोत्सवाचे कार्यक्रम,अनेक आरोग्य शिबीरे, राष्ट्र पुरुषांच्या जन्म दिनानिमित्त रुग्णांना फळे वाटप, कोविड काळात रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मोफत जेवण, पत्रकारिता क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकारांचा गौरव तसेच समाजतील उल्लेखनिय काम करणाऱ्या गुणवंतचा सत्कार, विध्यार्थी यांना अडचणीच्या काळात सहकार्य करणे तसेच गोरगरीब रुग्णांच्या सेवेसाठी,रुग्णवाहीका सेवा उपलब्ध करुन देण्याचे काम केले आहे. अशा सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय काम केल्याने त्यांना अन्याय आत्याचर निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष रवींद्र जाधव यांनी नाशिक येथे त्यांना पोलीस अधिकारी यांच्या शुभहस्ते समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. तसेच समांतर प्रतिष्ठान चे एकनाथ देसले यांनी हुतात्मा हिराजी पाटील जिल्हास्तरीय समाज भूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे. तसेच समता सामाजिक फाऊंडेशन चे शंकर करडे यांनी मुरबाड तहसीलदार यांच्या शुभ हस्ते युवा नेतृत्व म्हणून सन्मानित केले होते. अशा अनेक पुरस्कारानी आण्णा साळवे यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्याकडे एक दूरदृष्टी व्यक्ती म्हणून पहिले जाते. त्यांच्या या निवडीने राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. या कार्यक्रमासाठी मुरबाड तालुक्यातील लोकक्रांती सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नरेश मोरे, सुधाकर शेळके, संगीता ताई घोलप उपस्थित होत्या.

# श्री स्वामी समर्थ पालखी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास केंद्राच्या वतीने अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांचा पालखी सोहळा सोमवार 31 मार्च रोजी मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला. या धार्मिक कार्यक्रमाची सुरुवात श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास केंद्र, खडक आळी येथे सकाळी 5.00 ते 7.00 वाजेपर्यंत महापूजा करण्यात आली. 8.30 ते 9.00 आरती तसेच 10.30 ते 11.00 नैवेद्य आरती करण्यात आळी. दुपारी 12.00 ते 2.00 वा. पर्यंत जप पारायण करण्यात आला.दुपारी 3.00 वाजता स्वामी समर्थांची पालखी खडक आळी,बाळासाहेब ठाकरे नगर,गोवर्धन पोलसानी निवासस्थान, छत्रपती शिवाजीमहाराज चौक,छत्रपती शिवाजीमहाराज बा जारपेठ,ग्रा.प.कार्यालय,ग्रामदैवत जोगेश्वरीमाता मंदिर,आंगर आळी मार्गे खडकआळी येथील विकास केंद्रापर्यंत वाजत-गाजत मोठ्या भक्तिभावाने हजारो स्वामी भक्तांच्या उपस्थितीत पालखीची सांगता करण्यात आली. यावेळी महिला स्वामी भक्त पालखीत मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. या पालखीचे जागोजागी रांगोळी काढून स्वागत व स्वामीच्या मूर्तिची पुजा करण्यात आली.रात्री भंडारा (महाप्रसाद) चे आयोजन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्वालाग्रुप खडक आळी,बाजारपेठ विभाग तसेच विभागातील स्वामी सेवक व भक्तांनी विशेष मेहनत घेतली.



**जाहीर प्रकट**

मी तस्लीम बानू मंन्सुरी, घर नंबर १०६, बिल्डिंग नंबर ४, वेलविशर टाऊन, खोपोली. माझ्या मालमत्ता खरेदी खत कराराच्या मूळ प्रत मधून एक पेपर हरवला आहे
करार दिनांक: २५/०२/२०२५
करार क्रमांक: १३५९
कराराचे स्वरुप / प्रकार: घरा चे खरेदी खत
हरवलेल्या कागदाचे विवरण : ( ४२/४४)
करारा करिता उपस्थिति असणाऱ्या दस्तावेज करून देणारे आणि घेणारे आणि साक्षीदार याची पावती.
जर कोणाला ही पावती भेटल्यास पुढील नंबर वर संपर्क करावा . +919712827856

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

द•ख•ल

## शिवसेना शहर शाखेच्या वर्धापनदिनानिमित्त सत्यनारायण पूजा व हळदीकुंकू समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पनवेल शहर शाखेच्या वर्धापनदिनानिमित्त सत्यनारायण पूजा व हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने सत्यनारायण पूजेच्या कार्यक्रमास शिवसेना जिल्हा सल्लगार शिरीष बुटाला, मा.आ.बाळाराम पाटील, मा.सभागृह नेते परेश ठाकूर, मा.विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, मा.पंचायत समिती सभापती काशिनाथ पाटील, महिला आघाडीच्या लीना गरड, मा.नगरसेवक अनिल भगत, दीपक निकम, अवचित राऊत, अजय बहिरा, नितीन पाटील, हेमराज म्हात्रे, निर्मला पाटील आदींसह अनेक विविध पक्षाचे मान्यवर यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना पनवेल शहर प्रमुख प्रविण जाधव, मा.नगरसेवक अच्युत मनोरे, युवा सेनेचे पराग मोहिते, राकेश टेमघरे, कुणाल कुरघोडे, सन्नी टेमघरे, महिला आघाडी शहर संघटीका अर्चना कुलकर्णी, उज्वला गावडे, अश्विनी देसाई, रेश्मा कुरूप, अमित माळी, प्रशांत नरसाळे, संतोष तळेकर, शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी लकी ड्रॉ चे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी 10 भाग्यवान विजेत्यांना कुलर, घड्याळ, पैठणी, कुकर, फ्राय पॅन असे 20 बक्षीस देण्यात आली. तसेच बोल मराठी मातीचे मुकेश उपाध्ये प्रस्तुत लोकगीते, कोळीगीते, मराठी चित्रपट गीते, नृत्य असा बहारदार कार्यक्रमाचे आयोजन सुद्धा याप्रसंगी करण्यात आले होते.




## घरकुल बांधकामाचे काम पूर्ण झालेल्या घरांचा गृहप्रवेश

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पोयंजे ग्रामपंचायत पोयंजेवाडी घरकुल आवास योजनेतील घरकुल बांधकामाचे काम पूर्ण झालेल्या घरांचा गृहप्रवेश करण्यात आला. गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांच्या सूचनेनुसार हे काम पूर्ण करण्यात आले.

घरकुलांची कामे वेळेत पूर्ण करून संबंधित कुटुंबांना ताबा देण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बाष्ठेवाड यांच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू आहे. यावेळी संतोष ठोंबरे प्रशासक, धनंजय निकम ग्रामपंचायत अधिकारी, पोयंजे माजी सरपंच जगदीश मते, आशा म्हसकर, भगवान चोरघे, तानाजी खंडागळे, प्रवीण ठाकूर, प्रवीण भोईर, रवींद्र गायकवाड, कर्मचारी प्रसाद चोरघे, प्रगती मते, सारिका गायकर व ग्रामस्थ उपस्थित होते

## सणसर येथे शिवतेज चौकाची स्थापना

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**




सणसर ता.इंदापूर येथील शिवतेज चौकात रविवार 30 एप्रिल रोजी शिवतेज शिवजयंती मंडळाने हिंदू गुढीपाडवा व नवीन वर्षाच्या निमित्त साधून भगवा ध्वज व नामफलकाचे उदघाटन जेष्ठ नागरिक व माजी सरपंच विजयसिंह निंबाळकर व माजी शिक्षक विजय शिंदे सर यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आले.शिवतेज शिवजयंती मंडळ परंपरेने अक्षय तृतीयाचे मुहूर्तावर शिवजयंती साजरी करण्यात येत असून यावर्षी सुद्धा पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असल्याची माहिती कुलदीप निंबाळकर व राहुल जगताप यांनी दिली आहे. या उदघाटना प्रसंगी यात्रा कमिटी अध्यक्ष अक्षय निंबाळकर,विक्रम भैया निंबाळकर,नितीन नाना निंबाळकर,विजय शिरसट,राजेंद्र रायते,मिलिंद गाडेकर,सुधीर निंबाळकर,औदुंबर निंबाळकर,तुषार निंबाळकर,विजय भाग्यवंत,दत्तात्रय काळे,अमोल पाठक,निखिल भोसले,गणेश भोसले,अतुल घोडे, विलास रायते,मधुकर गायकवाड,रमेश सोनार,आदी ग्रामस्थ व मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# श्री एकविरा चैत्र यात्रानिमित्त पालखी प्रमुख व स्वयंसेवकांची नियोजन बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

श्री एकविरा देवस्थान ट्रस्ट आयोजित चैत्र सप्तमी ३ एप्रिल ते ५ एप्रिल २०२५ या कालावधीत देवींची यात्रा असून ४ एप्रिल २०१४ रोजी देवीचा पालखी सोहळा मोठ्या उत्सवात संपन्न होणार आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध आई एकविरा देवीची महती जगविख्यात असून आगरी, कोळी, सिकेपी व इतर समाजाची एकविरा देवी कुलस्वामिनी आहे . पालखीला व यात्रेला दरवर्षी लाखो भक्त भाविक दर्शनासाठी येत असतात. श्री एकविरा देवीची यात्रा व पालखी सोहळा निमित्त चैत्र सप्तमी यात्रा व पालखीचे औचित्य साधून किशोर धुमाळ (वरिष्ठ पोलीस निरीक्षक ) यांच्या अध्यक्षतेखाली व जयेंद्रदादा खुणे ( अध्यक्ष श्री एकविरा देवी भक्त भाविक मंडळ, महाराष्ट्र



राज्य) यांच्या प्रमुख उपस्थितीत पालखी प्रमुख व स्वयंसेवकांची नियोजन बैठक लोणावळा पोलीस ठाणे येथे संपन्न झाली. या बैठकीमध्ये किशोर धुमाळ यांनी पालखी प्रमुख व स्वयंसेवकांना कामाचे नियोजम व माहिती देऊन भक्त भाविक व पायी पालखी पदयात्रेकरुंना सहज, सुलभरीत्या व व्यवस्थित दर्शन व्हावे, यात्रेत भांडणे, तंटा अथवा घटना होऊ नये, पिण्याच्या पाण्याची सोय, पुणे ग्रामीण जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित केल्याने आदेशाचे पालन करावे. याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी जयेंद्रदादा खुणे यांच्यासह नितीन कदम ( गोपनीय अंमलदार ), सतीश कुदळे ( पोलीस कॉंस्टेबल ), संतोष वाडेकर ( पोलीस कॉंस्टेबल ), विशाल डवले, प्रतीक साळुंखे, किरण गवळी, निलेश म्हात्रे, गणेश सावंत, महेंद्र भोईर, रवी भोईर, संगम चवरकर,हेमंत पाटील,वैभव पाटील इत्यादी बहुसंख्य प्रतिनिधी उपस्थित होते. एकविरा भक्तांना टोल माफीसाठी जयेंद्रदादा खुणे यांचे विशेष योगदान श्री एकविरा देवीच्या यात्रेसाठी जाणाऱ्या सर्व भाविकांना टोल वसुलीचा आर्थिक भुर्दंड होऊ नये यासाठी यात्रा कालावधीत शेडुंग, खालापूर, वरसोली, वाकसई, कुसगाव येथील टोल माफ व्हावा म्हणून. जयेंद्रदादा खुणे यांनी वीरेंद्र म्हैस्कर (अध्यक्ष, आय.आर.बी. इन्फ्रा.), भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच सर्वच टोल प्लाझाला लेखी निवेदने दिलेली आहेत. एकविरा यात्रेला जाणाऱ्या भाविकांच्या वाहनांना टोलवर टोल घेणार नाही व सहकार्य केले जाईल असे टोल अधिकाऱ्यांनी सांगितले. यात्रेला जाणाऱ्या वाहनांना श्री एकविरा भक्त भाविक मंडळाचे अध्यक्ष जयेंद्रदादा खुणे यांच्याकडून गाडीला लावण्यास स्टिकर दिले जाणार असुन स्टिकर असलेल्या वाहनांकडून टोल घेतला जाणार नाही. जयेंद्रदादा खुणे यांच्या कार्याबद्दल सर्व स्तरावरील भक्तांकडून आभार व अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.

## गुढीपाडव्याच्या निमित्ताने शिवचरित्राचा भव्यदिव्य कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल येथील कल्पतरू सोसायटीमध्ये गुढीपाडव्याच्या निमित्ताने शिवचरित्राचा भव्यदिव्य कार्यक्रम पार पडला. हा सोहळा म्हणजे हिंदवी स्वराज्याच्या तेजस्वी इतिहासाचं सजीव चित्रण होते. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, ब्रह्माजी, आणि संपूर्ण सांस्कृतिक कमिटी यांच्या नेतृत्वाखाली कल्पतरूने गेल्या दहा वर्षांत विलक्षण प्रगती केली असून गुढीपाडव्याच्या निमित्ताने या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल होती. श्रीरामाच्या युगापासून सुरू झालेली गुढीपाडव्याची परंपरा, छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या माध्यमातून नव्या उंचीवर नेली. हाच वारसा जपत कल्पतरू सोसायटीतील बालगोपाळ,




तरुण, प्रौढ आणि सत्तरी पार केलेल्या आजी-आजोबांपर्यंत सर्वांनी या सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यांच्या अभिनयाने शिवरायांचा जन्म, बालपण, स्वराज्यस्थापना आणि राज्याभिषेकाचे तेजस्वी क्षण अनेकांच्या डोळ्यासमोर उभे राहिले. रोशन आंग्रे, रेवा आंग्रे यांनी कोरिओग्राफी केली होती. मराठी आणि इतर भाषिक या सर्वांनी ऐतिहासिक कार्यक्रमाची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

## शिवजयंती निमित्त 'स्पर्धा गोष्टींची' स्पर्धेचा निकाल जाहीर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक सेल पनवेलतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'स्पर्धा गोष्टींची' या ऑनलाईन स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. या स्पर्धेत छत्रपती शिवाजी महाराज यांचे आयुष्य, कर्तृत्व, नेतृत्व, दातृत्व, त्यांचे बालपण किंवा महाराजांच्या आयुष्यातील प्रसंग यापैकी एक विषय स्पर्धकांना देण्यात आला होता. त्यानुसार या स्पर्धेतील खुल्या गटात अविनाश बिरारी यांनी प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक सविता पाटील, तृतीय क्रमांक शार्दूल बुवा तर स्नेहल जगे यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक पटकाविले. शालेय गटात विधी केणे प्रथम क्रमांक, संस्कार पाटील द्वितीय क्रमांक, तृतीय क्रमांक मधुश्री शिंदे आणि रश्मी म्हात्रे हिने उत्तेजनार्थ क्रमांक मिळविला. प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तजेनार्थ क्रमांकास अनुक्रमे ३ हजार रुपये, २ हजार रुपये, १ हजार रुपये आणि ५०० रुपये आणि प्रमाणपत्र देऊन लवकरच एका कार्यक्रमाचे आयोजन करून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

## माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे सिल्लोड तालुका अध्यक्षपदी योगेश पालोदकर यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** : - माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण आणि पोलीस मित्र फाउंडेशन संचलित माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे तालुका उपाध्यक्ष योगेश रामचंद्र पालोदकर यांना छत्रपती संभाजीनगर जिल्हा उपाध्यक्ष विलास दांडगे यांच्या शिफारशीनुसार समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेश सारणीकर साहेब यांच्याकडून सिल्लोड तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



त्यांच्या गेल्या दोन-चार वर्षाच्या कामाचे मोजमाप व त्यांचे समितीच्या संघटनात्मक कार्याची दखल लक्षात घेता युवा व धडाडीचे पत्रकार यांनी इतर अपेक्षित घटकांना न्याय देण्याच्या दृष्टीने त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव या नात्याने त्यांना माहिती अधिकार तालुका उपाध्यक्ष या पदावरून सिल्लोड तालुका अध्यक्ष या पदावर पदोन्नती दिल्याने त्यांच्यावर तालुक्यातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. अशावेळी समितीतील युवा पदाधिकाऱ्याला संधी मिळणे आणि त्यातच त्याने संधीचे सोने करणे याला योगायोग म्हणावा लागेल. अपेक्षित घटकांची ठिकठिकाणी होत असलेली त्यांची गळचेपी थांबवण्यासाठी त्यांना योग्य न्याय देण्या साठी व त्यांचे प्रश्न वेळोवेळी मार्गी लावण्यासाठी समितीच्या संघटनात्मक कार्यासाठी त्यांनी तालुक्यात काम करावे असे नियुक्तीपत्र समितीचे राज्य अध्यक्ष महेश सारणीकर यांच्यातर्फे त्यांना देण्यात आले आहे.

## उरणमध्ये रमजान ईद उत्साहात साजरी

### 11 हजार 500 मुस्लीम बांधवांनी अदा केला नमाज

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

31मार्च 2025 रोजी रमजान ईद निमित्त उरण पोलीस ठाणे हद्दीतील 5.200 मुस्लीम बांधवांनी नमाज अदा करून एकमेकांना रमझानईद निमित्ताने शुभेच्छा दिल्या. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखालीउरणमध्ये कोणताही अनुचितप्रकार घडूनये याकरिता सर्वत्र कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. उरणांतील मदरसा - ए - मेहमुदीया खिडकोळी नाका उरण येथे सकाळी 7:00ते 7:30 या वेळेत 1200 ते 1250 मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला. खॉजा गरीब नवाज सुन्नी हनफी मदरसा बालई रोड उरण येथे सकाळी 7: 00ते 7:30 या सत्रात 700 ते 800 मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला. सकाळी8:00 ते 9:00 वाजता दुसऱ्या सत्रात सुमारे 500 ते 600 मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला. तरउरण पोलीस ठाण्याजवळ असलेल्या जामा मशिद येथे दोन सत्रात मुस्लीम बांधवांनी सकाळच्या पहिल्या सत्रात 7 :20 ते 7:55 वाजता सुमारे 5000 ते 55000 मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला.तर दुसऱ्या सत्रात 8:15 ते 8:35 या वेळेत 2500 ते 3000 मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला. अशाप्रकारे उरण मध्ये एकूण सर्व मशिद मधून सुमारे 11,500 मुस्लीम बांधवानी नमाजअदा केल्या नंतर उरण पोलीस ठाण्याच्या वतीने सर्व मुस्लीम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा देण्यांत आल्या. या वेळी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ , उरण ,वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी सर्व मुस्लीम बांधवांना गुलाब पुष्प देवून त्यांचे स्वागत करून त्यांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

# ठाणेदार चौधरी यांच्या 'एक कॅमेरा समाजासाठी''संकल्पनेस प्रतिसाद !

## अरिहंत किराणा यांचेकडून महात्मा फुले चौकात सिसिटिव्ही यंत्रणा कार्यरत...

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी**

**करण धोंगडे :-** मालेगाव शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी व कायदा- सुव्यवस्थेसाठी पोलिसांकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत याच अनुषंगाने, मालेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक १२ जैन मंदिर समोरील अरिहंत किराणा दुकानावर चार सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. मागील काही काळात या परिसरात महात्मा फुले चोकामध्ये वारंवार वादाच्या घटना घडल्या असून, तब्बल सात महिन्यांपूर्वी येथे चाकू हल्ल्याची धक्कादायक घटना घडली होती त्यानंतर पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांनी परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यांच्या सूचनेनुसार, सामाजिक सुरक्षेच्या






हेतूने संदीप देशभूषण सावले यांनी पुढाकार घेत अरिहंत किराणा दुकानावर कॅमेरा बसवण्याचा निर्णय घेतला व त्यांच्या स्वखर्चाने कॅमेरे बसवण्यात आले व सामाजिक सुरक्षेसाठी महत्त्वाचा उपक्रम हा उपक्रम "एक कॅमेरा समाजसेवेसाठी" या संकल्पनेतून राबवण्यात आला असून. यामुळे परिसरात होणाऱ्या गुन्हेगारी घटनांवर नियंत्रण मिळवणे, चोरी-लुटमारीला आळा घालणे तसेच कायदा-सुव्यवस्थेचा भंग करणाऱ्या घटकांवर नजर ठेवणे सहज शक्य होणार आहे. याशिवाय, या भागात वारंवार घडणाऱ्या वाद- विवादांना प्रतिबंध होईल,असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे पोलीस निरीक्षक संजय चौधरी साहेब व त्यांची पोलीस स्टेशनची टीम यांनी अरिहंत किराणा दुकानांमध्ये येऊन पाहणी करून या उपक्रमाचे कौतुक करत. शहरातील इतर व्यापारी व नागरिकांनीही सुरक्षेच्या दृष्टीने आपल्या दुकानांपुढे आणि घरासमोर सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असे आवाहन केले आहे शहराच्या सुरक्षिततेसाठी सर्वांनी एकत्र येऊन योगदान दिल्यास मालेगाव गुन्हेगारीमुक्त आणि सुरक्षित शहर बनवणे शक्य होईल. असेही त्यांनी सांगितले यावेळी उपस्थित मालेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय चौधरी, उपनिरीक्षक रवी सैबैवार, पो. हवा. किशोर चिंचोळकर, सुनील पवार, पो. शि. अमोल पवार, जितू पाटील,व तसेच तुषार कान्हेड, देशभूषण सावले,निखिल बांडे, संदीप सावले, आशिष डहाळे, सचिन बांडे, धीरज कान्हेड, प्रदीप सावले, आधीजन उपस्थित होते व तसेच सामाजिक सुरक्षेसाठी नागरिकांनी हा पुढाकार घेऊन पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, हीच या उपक्रमामागील मुख्य संकल्पना आहे. आपली सुरक्षा, आपली जबाबदारी!

मालेगावात सुरक्षेसाठी आणि समाजसेवेसाठी सीसीटीव्ही कॅमेरा लावन्यात आला आहे.. मालेगाव शहरातील प्रभाग क्रमांक 12 जैन मंदिर समोरील अरिहंत किराणा दुकान येथे सुरक्षेसाठी तसेच समाजसेवेसाठी चार सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. मागील सात महिन्यांत या परिसरात काही गंभीर घटनांचा मागोवा घेतला असता,एका व्यक्तीवर चाकू हल्ला झाल्याची घटना घडली होती या पार्श्वभूमीवर मालेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांनी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही बसवण्याच्या सूचना दिल्या होत्या या सूचनेनुसार, सामाजिक बांधिलकी जोपासत संदीप देशभूषण सावले यांनी आपल्या अरिहंत किराणा दुकानावर सुरक्षेसाठी चार कॅमेरे आणि समाजसेवेसाठी एक कॅमेरा बसवला आहे हा उपक्रम परिसरातील सुरक्षेसाठी तसेच सामाजिक कार्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

# अंभोरा येथील नवसाला पावणाऱ्या अंबेश्वराचा महायात्रा उत्सव

**दैनिक युवक आधार**
**अंभोरा प्रतिनिधी**
**बाळासाहेब रकटाटे**

आष्टी तालुक्यातील अंभोरा येथील नवसाला पावणारा अंबेश्वर अशी ख्याती असणाऱ्या अंबेश्वर महादेवाची महायात्रा उत्सव 2 एप्रिल ते 3 एप्रिल रोजी यादिवशी संपन्न होत आहे.




आष्टी तालुक्यातील अंभोरा येथील श्री शंभू महादेवचे अंबेश्वराचे पुरातन कालीन हेमाडपंती मंदिर आहे या मंदिराचे बांधकाम तेराव्या शतकात देवगिरीकर यादवांच्या काळात झाले असावे असा ग्रामस्थांचा अंदाज आहे. मंदिराची जरी जीर्णोध्दार झाला असला तरी मंदिराचा गाभारा याच काळातील जसाचा तसा ठेवण्यात आला आहे त्यामुळे त्या काळातील इतिहासाची साक्ष आपणांस या मंदिरात पहावयास मिळते. अतिशय सुंदर असे मंदिर जवळपास पाच एकरामध्ये आहे भाविकांना सावलीत बसण्यासाठी बाक बसविण्यात आलेली आहेत या मंदिरातील बऱ्याच मुर्त्या पुरातन काळातील आहेत मंदिराच्या बाहेर असलेला नंदी भाविकांचे लक्ष वेधून घेतो त्याठिकाणी अतिशय सुंदर असे सभामंडप बनवलेले असून या ठिकाणी भाविक दर्शनानंतर क्षणभर विश्रांती घेतात या ठिकाणी अतिशय सुंदर अशी पुरातन काळात बनवलेली महादेवाची पिंड असून मंदिराचा गाभारा जीर्णद्धारानंतर जसाचा तसा ठेवन्यात आलेला आहे अंबेश्वराची दरवर्षी फार मोठी यात्रा या ठिकाणी फार वर्षापासून भरते गुढीपाडव्यानंतर पंचमीच्या दिवशी यात्रा भरते हा महा यात्रा उत्सव दोन दिवस चालतो या दोन दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणावर कार्यक्रमाची रेलचेल असते यावर्षी *दोन एप्रिल व तीन एप्रिल* या दिवशी यात्रा उत्सव संपन्न होणार असून यामध्ये यात्रेच्या पहिल्या दिवशी सकाळी कावडीने आणलेल्या पाण्याने महादेव देवाला जलाभिषेक घालण्याचा कार्यक्रम संपन्न होतो गावातील होतकरू तरुण व भाविक पाडव्याच्या दिवशी पैठण व वृद्धेश्वर या ठिकाणी कावडीने पाणी आणण्यासाठी जातात एप्रिल प्रखर उन्हामध्ये हे तरुण पायी पैठण वृधेश्वर वरून पाणी आणतात काही तरुण तर चप्पल न घालता अंबेश्वरावर असणाऱ्या श्रद्धेपोटी उन्हामध्ये पायी चालत येतात सकाळी हा जलाभिषेक घातल्यानंतर अनेक भाविक वर्षभर केलेल्या नवसाच्या फेड म्हणून शेरनी ( पेढे ) वाटून नवसाची फेड करतात दुपारी तीन वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत वाजत गाजत शेरनी वाटपाचा कार्यक्रम चालू असतो या यात्रेचे खास आकर्षण म्हणजे छबीना याठिकाणी हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन होते यात दोन्ही समाजाचे लोक सहभागी होतात गेल्या कित्येक वर्षापासून ही परंपरा चालू आहे छबीना मिरवणुकी नंतर पहाटे फटाक्यांची आतिशबाजी पाहण्याची मजा काही औरच असते फटाके वाजवले जातात दुसऱ्या दिवसाचे खास आकर्षण म्हणजे कुस्त्यांचा जंगी हंगामा हजेरी व तमाशा अशा कार्यक्रमाने दुसरा दिवस भरलेला असतो दुसऱ्या दिवशी सकाळी परिसरातील कलाकार आपली कला दाखवून बीदागी ग्रामस्थांकडून घेतात तमाशा कलावंतही आपली कला या ठिकाणी कला दाखवितात या दिवशी दुकानाचे मोठे रेलचेल असते खाऊचे दुकाने खेळण्याचे दुकाने परिसरातील लोक खरेदीसाठी व अंबेश्वराच्या दर्शनासाठी मोठी गर्दी करतात त्या दिवसाचे खास आकर्षण म्हणजे कुस्त्यांची दंगल ठीक 2 वाजता ही कुस्त्यांची दंगल सुरू होते सुरुवातीला लहान मुलांच्या कुस्त्या रेवड्यावर सुरू होतात तर मग पाचशे रुपयांपासून दहा हजार रुपयांपर्यंत कुस्त्या होतात या ठिकाणी परिसरातील सर्वात सर्वात मोठा कुस्त्यांचा हंगामा संपन्न होतो.

## पनवेल गावदेवी पाडा येथे १०८ थानापती महंत पदवीदान सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक )**

दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी पनवेल येथील गावदेवी पाडा श्री स्वामी समर्थ मठ येथे सकाळी ११ वाजता १०८ थानापती महंत पदवीदान सोहळा श्री महामंडलेश्वर काशिनाथदास गुरु खाशाबा दास वैष्णव सदन आनंद आश्रम जांभिवली भिवंडी ठाणे यांच्या सेवेतून वैदिक सनातन धर्माच्या अविभाज्य घटक असलेल्या वारकरी संप्रदायातील धर्मप्रसारक अभ्यासक संत मंडळीस यांच्या कार्याचा गौरव म्हणून महामंडलेश्वर काशिनाथदाजी खाशाबादास महाराज निवृत्तीनाथ खालसा प्रमुख द्वारा चादरीने लपटून फुलांचा वर्षाव करत मंत्रमुग्ध केलं आणि गळ्यात हार घालून ह,भ,प,सुधाकर लक्ष्मण घरत यांना १०८ थानापती महंत या पदी नियुक्त करण्यात आले व नियुक्तपत्र देऊन सन्मानित केले यावेळी प्रमुख उपस्थिती १००८ महामंडलेश्वर महंत काशिनाथ दास महाराज खाशाबादास महाराज १००८ महामंडलेश्वर अनंतदास महाराज व जगद्गुरु नामदेव महाराज खलसधारी महंत गणेशानंद महाराज १००८ महंत श्रीकांतदाजी महाराज मा,आमदार बाळाराम पाटील,आमदार विक्रांत पाटील,परेशशेठ ठाकूर व प्रीतमशेठ म्हात्रे उपस्थित होते यावेळी पनवेल व पनवेल परिसरातील श्री स्वामी समर्थ भक्त मोठ्या संख्येने होते यावेळी सूत्रसंचालन हरीश मोकल यांनी केले या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजक अवधूत सुधाकर घरत व स्वामी समर्थ भक्त मंडळ पनवेल हे होते.



## गुड मॉर्निंग इंडीया

सुनिल शां. पेंडूरकर

ओटबँकेच्या राजकारणात औरंग्याची कबर राहीली बाजुला. वाघ्या कुत्र्याची कबर हटवा या साठी सगळे नेते लागले बोंबलायला. बहुतेक हा वाघ्या कुत्रा औरंग्या पेक्षा कुकर्मा असावा. याने बहुतेक मागच्या जन्मी या नेत्यांच्या पार्श्व भागाचा चावा घेतला असावा.





राज्याचे माजी अल्पसंख्याक विकास मंत्री तथा राज्याचे माजी कृषिमंत्री तसेच सिल्लोड सोयगावचे आमदार अब्दुल सत्तार साहेब यांना ईदगाह सिल्लोड येथे रमजान ईद (ईदउलफित्र) च्या शुभेच्छा देताना हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर आणि मुलगा जिशान अहमद...

( छायाचित्र दैनिक युवक आधार )

# यशवंतराव चव्हाण सैनिक शाळेत विद्यार्थ्यांना दिले स्वच्छतेचे धडे...

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे :-** वाशिम:सुपखेला येथील यशवंतराव चव्हाण सैनिक शाळेत गांधी रिसर्च फाउंडेशन तर्फे आयोजित गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता अंतर्गत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य.एम.एस.भोयर सर होते.प्रमुख मार्गदर्शक व्हि.एम.जाधव तर प्रमुख उपस्थिती एस.बी.चव्हाण, एस.एम.गाभणे यांची होती.गांधी रिसर्च फाउंडेशन तर्फे गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगितेचे आयोजन संपूर्ण राज्यभर करण्यात आले आहे त्यामध्ये वाशिम जिल्ह्यातील यशवंतराव चव्हाण सैनिक शाळेने सहभाग घेतला आहे.त्या अंतर्गत शाळेमध्ये वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात आले त्याचाच एक भाग म्हणून शाळेमध्ये 'स्वच्छता ही काळाची गरज'या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.यामध्ये विविध विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले त्यामध्ये कुणाल अववार, कृष्णा वाजुळकर, श्रीहरी चव्हाण, गिरीराज गंगावणे,गजानन दुबळकर, रोशन ठोंबरे इत्यादी.मार्गदर्शक व्हि. एम जाधव यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता काळाची गरज का आहे हे आपल्या भाषणातून सांगितले. उपप्राचार्य एस.बी.चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना अस्वच्छतेमुळे विविध आजारांना आपण कशाप्रकारे बळी पडू शकतो या विषयी अवगत केले तर शाळेचे प्राचार्य एम.एस. भोयर सर यांनी आपल्या अध्यक्षीय





भाषणात विद्यार्थ्यांना स्वच्छते संदर्भात मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी.पी. पोळकट यांनी केले तर आभार प्रदर्शन जी.टी.मोरे यांनी केले.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन एम.एन.वानखेडे व एस.एस.मोळके यांनी केले.सदर कार्यक्रमाला शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

## पारंपरिक शेती ऐवजी फुल शेती करत मुळुकवाडी येथील शेतकरी चंद्रसेन ढास यांनी फुलवला समृद्धीचा मळा :- डॉ.गणेश ढवळे


**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**
– बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतकरी चंद्रसेन शेषेराव ढास या शेतकरी कुटुंबाने पारंपरिक पिकांऐवजी फुलाची शेती करत समृद्धीचा मळा फुलवला आहे. साधारणतः १००० लोकसंख्या असलेल्या मुळुकवाडी गावातील शेतकरी प्रामुख्याने कांदा पिक घेतात. संपुर्ण लिंबागणेश पंचक्रोशीत एकमेव फुलशेती करणारे शेतकरी म्हणून चंद्रसेन ढास यांची ओळख आहे. १२ वर्षांपूर्वी मुळुकवाडी येथील १० शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गुलाब फुलांची गट शेती करण्याचा निर्णय घेतला होता. त्या नंतर केवळ चंद्रसेन ढास हेच फुलशेती व्यवसायत तग धरून जिद्दीने करत आहेत. सकाळी उठून कळी तोडली तरच २ दिवस ती टिकते त्या मुळे या साठी घरचे मजुर असणे गरजेचे आहे. चंद्रसेन ढास यांना ५ एक्कर शेती असुन त्या पैकी ३ एक्कर शेतात फुल शेती करतात. फुलांना योग्य दर मिळण्यासाठी लागवड ऐन उन्हाळ्यात म्हणजे पाणी टंचाईच्या काळात करावी लागते. पावसाळा सुरू असताना उत्पादन निघण्यास सुरूवात होत असल्याने अनेकदा कमी जास्त पावसाचा फटका फुल शेतीस बसतो मात्र अस्मानी सुलतानीचा विचार न करता जोखीम पत्करून फुल शेती करतात.

शेतकऱ्यांना फुलशेती मध्ये चांगले उत्पन्न मिळू लागले आहे.शेतक-यांनी योजनेचा लाभ घेऊन फुलशेती मध्ये प्रगती करावी यासाठी शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग,वनपिके, मसाला पिके व फुलशेती आदींसाठी १ वर्षं ते ३ वर्षं अनुदान तत्वावर शासकीय योजना कार्यान्वित आहे.मात्र बीड कृषी विभागाची अनास्था यास कारणीभूत असुन दोन वेळा केलेली फाईल त्यांनी आपल्या भागात फुलशेती नसल्याने नाकारली असल्याची खंत चंद्रसेन ढास यांनी बोलून दाखवली.

**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर**
**मो.नं.८१८०९२७५७२**

फुलांना श्रावणात, गणेशोत्सवात तसेच नवरात्रोत्सवात मोठ्या प्रमाणावर मागणी असते. फुलांचे बाजार भाव स्थिर नसतात, गुलाब, गलांडा, गुलछडी, बिजली, अश्टर, झेंडु, शेवंती आदी फुलांचे उत्पादन करण्यात येते. बीड, केज, पाटोदा या ठिकाणी फुले विक्री साठी पाठवली जातात. चंद्रसेन ढास यांच्या पत्नी सविता ढास, मुलगा प्रणव ढास, अथर्व ढास फुल शेतीत मदत करतात. मोठा मुलगा प्रणव ढास यांने पुणे येथे इव्हेंट मॅनेजमेंट कोर्स केलेला आहे तर अर्थव शिक्षण घेत आहे. लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकरी फुल सेंटर प्रसिद्ध असुन धार्मिक, लग्न समारंभ, वाढदिवस विविध कार्यक्रमांसाठी आवश्यक हारांसाठी चंद्रसेन ढास यांच्या कडे मागणी असते.

कृषी विभागाची अनास्था ; आपल्या भागात फुलशेती नाही म्हणत कृषी विभागाने दोनदा दाखल केलेली फाईल रद्दबातल केली :- चंद्रसेन ढास




# सद्या शोशल मीडिया वर धुमाकूळ घालत आहे तेजू आणि वेदूचे व्हिडीओ

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी
राजेश भडांगे

विंचूर :-विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयामध्ये इयत्ता पाचवीत शिकणारी वेदिका चव्हाण व इयत्ता सातवीत शिकणारी तेजस्विनी चव्हाण या दोन्ही सख्ख्या बहिणींनी बनवलेले व्हिडिओ सध्या सोशल मीडिया वरती धुमाकूळ घालत आहेत या विद्यार्थिनींनी विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घेऊन भरपूर बक्षीस मिळवली आहेत. सोशल मीडियावर या दोन्ही भगिनी तेजू आणि वेदु या नावाने प्रसिद्ध आहेत. अनन्या अनन्या सावध हो जरा, या गाण्याचा तेजू आणि वेदू या दोन्ही बहिणींनी बनवलेला व्हिडिओ सध्या इंस्टाग्राम वर धूमाकूळ घालतोय , जवळपास १ लाख ६५ हजार इंस्टाग्राम धारकांनी या व्हिडिओला लाईक केले आहे तर ५ लाख पेक्षा जास्त लोकांनी हा व्हिडिओ पाहिला आहे. लहान वयातच अभ्यासाबरोबरच सोशल मीडियावर आपली वेगळी छाप निर्माण करणाऱ्या या दोन्ही बहिणी . मूळचे सातारा जिल्ह्यातील फलटण येथील असून सुनील चव्हाण हे मसाला व्यवसायानिमित्त कोविड काळापासून विंचूर येथे स्थायिक झाले.

त्यांचे वडील नाशिक जिल्ह्यात मसाला विक्रीचा व्यवसाय करीत होते. त्यांची पत्नी अश्विनी यांची त्यांना भक्कम साथ आहे. दारोदारी घरपोच कच्चा मसाला विक्रीचे काम करत असतात. दोघीही अभ्यासात हुशार, आठवड्यातून पाच दिवस सातत्याने अभ्यास आणि फक्त शनिवार व रविवार चांगले



व्हिडिओ बनविण्याचा त्यांचा छंद आज इंस्टाग्राम वर मोठ्या प्रमाणात धूम करतो आहे. आजोबा जयसिंग चव्हाण यांना गायन वादनाची आवड असल्याने कलापथक होते त्यामुळे घरात गायन वादनाची आवड निर्माण झालेल्या तेजू वेदू या वेगवेगळ्या व्हिडिओच्या माध्यमातून सोशल मीडियावर प्रसिद्ध झाले आहेत.

इंस्टाग्राम या सोशल मीडिया अकाउंट वर ९१२ पोस्ट त्यांनी आतापर्यंत केले असून लाखोंच्या घरात त्यांचे चाहते त्यांना फॉलो करून अत्यंत कमी वयात त्यांना डोक्यावर घेत आहेत. घरची परिस्थिती अत्यंत बेताची असलेल्या तेजू आणि वेदू यांच्या दोन महिन्यापूर्वी बनविलेल्या अनन्या व्हिडिओला १ लाख ६५ हजार पेक्षा जास्त लोकांनी फॉलो केले आहे.

रिल्स, व्हिडिओ, च्या माध्यमातून संपूर्ण राज्यात प्रसिद्ध झालेल्या तेजू ला भविष्यात ब्युटी पार्लर आणि वेदू डॉक्टर होण्याची तीव्र इच्छा आहे. मात्र घरची परिस्थिती बेताची असल्याने त्यांचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी सोशल मीडियाची भविष्यात मदत निश्चित मिळेल अशी आशा त्यांना आहे.

दोघी बहिणींच्या

अनन्या, अनन्या- या गाण्याला ५,४६,००० तर
बाबुल का प्यार तू- या गाण्याला ८,९०,०००
इंदुरीकर महाराज आधारित व्हिडिओ- ६ मिलियन
आईचा मार खाल्यावर हाल- २ मिलियन
डोहाळे जेवण व्हिडिओ- ३ मिलियन

मोठ्या प्रमाणात लाईक्स मिळालेली आहेत त्यामुळे विंचूर व विंचूर पंचक्रोशीत कौतुकाच्या विषयी झाल्या आहेत.

## गोरक्षनगर( निकम वस्ती) धारणगाव वीर ता. निफाड येथे हनुमान जन्मोत्सव निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**धारणगाव वीरः-** हनुमान जन्मोत्सव निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे हे 34 वर्ष आहे तरी

सर्व भाविक भक्तांना कळविण्यात येते की सालाबादाप्रमाणे श्री *योगीराज स्वानंद सुखनिवासी वै. गुरुवर्य तुकाराम बाबा व प.पू. वै. माऊलीबाबा (खेडले झुंगे ) वै. गुरुवर्य काशिनाथ बाबा यांच्या कृपाशीर्वादाने तसेच ह. भ. प. श्री गणपत महाराज नागरे व ह. भ. प. रघुनाथ महाराज खटाणे (खेडले झुंगे )* यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील नामवंत तत्त्वचिंतन कीर्तनकारांची कीर्तने आयोजित केले आहे तरी सर्व भाविक भक्तांनी या अमृतमय कीर्तन सोहळ्याच्या अवश्य लाभ घ्यावा ही समस्त ग्रामस्थ गोरक्षनगर( निकम वस्ती) भजनी मंडळांनी विनंती केली आहे

शनिवार दि. 12 /4 /2025 ते शनिवार दि. 19 /4 /2025 पर्यंत कीर्तन सोहळ्याचे आयोजन केले आहे यावेळी पहाटे 4 ते 6 काकड भजन, सायंकाळी 6 ते 7 हरिपाठ व रात्री 9 ते 11 हरिकीर्तन असेल शनिवारी दि. 19 /4 /2025 रोजी सकाळी 8 ते 9 दिंडी प्रदक्षिणा व 9



ते 11 या वेळेत *संजय महाराज ठुबे* यांचे काल्याचे किर्तन आयोजन केले आहे व त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल शनिवार दि. 12/4/ 2025 रोजी *ह.भ.प रविराज महाराज काळे ( मिराबाई संस्थान पंढरपूर )* श्री हनुमानजी चरित्रावर हरिकीर्तन होणार आहे, रविवार दि. 13/ 4/ 25 रोजी *ह.भ.प. भगवान महाराज गतिर( इगतपुरी)* संत ज्ञानेश्वर महाराज चरित्रावर हरिकीर्तन होणार आहे, सोमवार दि.14 /4 /2025 *ह.भ. प. माधव महाराज काजळे (नाशिक)* यांचे संत तुकाराम चरित्रावर हरी किर्तन होणार आहे, मंगळवार दि. 15/ 4/ 2025 रोजी *ह.भ.प. गोरख महाराज कुदळ (पाटोदा)* यांचे संत चोखोबा महाराज चरित्रावर हरिकीर्तन होणार आहे, बुधवार दि. 16 /4 /2025 रोजी *ह.भ.प.राधेश्याम महाराज गाडे (भिंगारे)* यांचे संत जनाबाई चरित्रावर हरिकीर्तन होणार आहे, गुरुवार दि. 17 /4/ 2025 रोजी *ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज शिंदे (रुई साधना आश्रम)* यांचे संत एकनाथ महाराज चरित्रावर हरिकीर्तन होणार आहे, शुक्रवार दि. 18/ 4/ 2025 रोजी *ह. भ. प. तुकाराम महाराज वाजे (वागदर्डी)* यांचे संत मुक्ताबाई चरित्र( मुंगी उडाली आकाशी) हे हरिकीर्तन होणार आहे,शनिवार दि. 19 /4/ 2025 रोजी *ह.भ. प. संजय महाराज ठुबे, (गुंजाळवाडी)* यांचे श्रीकृष्ण चरित्रावर हरिकीर्तन होणार आहे तरी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी हरी कीर्तनाचा लाभ घ्यावा असे *समस्त ग्रामस्थ भजनी मंडळ धारणगाव वीर ( निकम वस्ती ) गोरक्षनगर यांनी विनंती केली आहे

## 'जि. प. शाळा वरुड तोफा येथे रमजान ईद निमित्त उत्साहात साजरी"

**दैनिक युवक आधार**
**रिसोड वार्ताहर**
**रणजीत सिंह ठाकुर**

रिसोड तालुक्यातील रोड तोफा येथे रमजान ईद निमित्त शिरखुरमा वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला. शाळेचे मुख्याध्यापक ब्रह्मानंद वानखडे सर व सहशिक्षक शंकर बोरकर सर यांनी आपल्या शाळेमध्ये अतिशय सुंदर प्रकारे कार्यक्रम आयोजित केला विद्यार्थ्यांना सण व त्या बद्दल माहिती करून दिली एकता,समता, बंधुता व सर्व धर्म समभाव ची शिकवण करून दिली या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक व गावातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. शाळा व्यवस्थापन समितीचेही सहकार्य लाभले व सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, यांची हजेरी, शाळेतील शिक्षक शंकर बोरकर सर यांनी रमजान ईद विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले मुस्लिम धर्माचे दोन महत्त्वपूर्ण सण म्हणजे ईद उल फित्र व दुसरी ईदुज्जुह. ईद उल फितर ईद ही आनंद साजरा करण्याची ईद मानली जाते. आप आपसात बंधुत्वाचे संबंध प्रस्थापित करून प्रेम व आनंदाने साजरा केला जाणारा सण अशी त्याची ओळख आहे. याउलट ईदुज्जुहा म्हणजे कुर्बानी व त्यागाचे पर्व मानले जाते.ईद उलल फित्र हा अरबी भाषेतील शब्द आहे. ईद या शब्दाचा अर्थ आनंद असा आहे. तर फित्र म्हणजे दान करणे. अन्नाच्या स्वरूपात दान केले जाते. फित्र हा मुस्लिम शरियत



कायद्यातील मापदंड आहे. रमजान महिन्यातील रोजे संपल्यानंतर ईद येते. ईद हा आनंदाचा सण असल्याने ईदच्या दिवसांमध्ये मुस्लिम बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद खुललेला दिसतो. ईदला नवीन वस्त्र परिधान करून मुस्लिम बांधव ईदगाह किंवा मशिदीत नमाज अदा करायला जातात. अल्लाच्या प्रती नमाज अदा केल्यानंतर मुस्लिम बांधव एकमेकांना आलिंगन घेऊन ईदच्या शुभेच्छा देतात. या दिवशी मित्र असो वा शत्रू ते दोघांची गळाभेट घेऊन शुभेच्छा

देतात. ईदला आपल्या घराला रंगरंगोटी करून आप्तजनांना आपल्याकडे शिरखुर्मा खाण्यासाठी आमंत्रित केले जाते. ईदच्या शुभ पर्वाला गरीब, अनाथ मुस्लिम बांधव आनंदापासून वंचित राहत असेल तर ती ईद मुस्लिम धर्मासाठी आनंदाची नाही, असे मानले जाते. मुस्लिम धर्मातील तळागाळातील व्यक्तीला ईदच्या पावन पर्वाचा आनंद घेता यावा, यासाठी जकात व फित्रिची तरतूद मुस्लिम शरियत कायदामध्ये करण्यात आली आहे. जकात हे ईदच्या आधी दिले जाते. कारण त्यांनी ही या वर्षांतून एकदा येणाऱ्या महान पर्व- ईदचा आनंद लुटता यावा यासाठी बोरकर सर यांनी खूप मोलाची मार्गदर्शन केले व त्यानंतर सर्व मुलांना शीरखुर्मा पार्टीचा आनंद घेण्यात आला शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये व तसेच गावकरी मंडळी मध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले विद्यार्थ्यांमुळे शिक्षक आनंदी व शिक्षकांमुळे गावकरी आनंदी होते.याबाबतची माहिती महिला मुक्ती संघटन उपाध्यक्ष प्रवीण विश्वनाथ वानखडे यांनी दिली.

# जिल्हा परिषद यवतमाळ समोर शिक्षकांचे बेमुदत साखळी उपोषण सुरू

**यवतमाळ प्रतिनिधीः-**
**जितेंद्र खोडे**
**यवतमाळ,**
**दि.०१ एप्रिल.**

जिल्हा परिषद यवतमाळ समोर आज दिनांक ०१ एप्रिल (सोमवार) पासून शिक्षक संघटनांच्या वतीने बेमुदत साखळी उपोषण आणि धरणे सत्याग्रह सुरू करण्यात आला आहे.शिक्षकांच्या प्रलंबित पदोन्नती,विषय शिक्षक वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करणे, तसेच विस्तार अधिकारी,केंद्रप्रमुख,मुख्याध्यापक पदोन्नतीसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे.

यावेळी उपोषणकर्त्यांमध्ये सुनिता गुघाणे (बुटले),जया रोहणकर, संध्या केशववार,वंदना नाकतोडे, छाया उम्रतकर,राजश्री कोमावार यांचा समावेश आहे.जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनांचा या आंदोलनाला पाठिंबा प्राप्त आहे. शिक्षक संघटनांनी यापूर्वी अनेक वेळा आपल्या मागण्यांसाठी निवेदने सादर केली होती.२० जानेवारी २०२५ रोजी एकदिवसीय धरणे आंदोलन आणि साखळी उपोषण करण्यात




आले होते, त्यावेळी आमदार बाळासाहेब मांगूळकर यांच्या उपस्थितीत प्रशासनाने १० फेब्रुवारी २०२५ पर्यंत सर्व मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते.मात्र,दोन महिने उलटूनही ठोस कार्यवाही न झाल्याने शिक्षक संघटनांनी पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.

**मुख्य मागण्याः**

विषय शिक्षक वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करून सेवाजेष्ठ विषय शिक्षकांचा समावेश करणे आणि सुधारित आदेश तात्काळ जारी करणे.

उर्दू माध्यमाच्या विषय शिक्षकांचे वेतनश्रेणी आदेश ०५ एप्रिल २०२५ पर्यंत काढणे.

विस्तार अधिकारी पदोन्नती प्रक्रिया ०५ एप्रिल २०२५ पर्यंत समुपदेशन घेऊन पूर्ण करणे.

केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी सेवाजेष्ठता यादी ०३ एप्रिल २०२५ पर्यंत प्रसिद्ध करून १५ एप्रिल २०२५ पर्यंत समुपदेशन घेऊन पदोन्नती आदेश काढणे.

माध्यमिक शिक्षक,उच्च श्रेणी मुख्याध्यापक, उच्च माध्यमिक शिक्षक तसेच विस्तार अधिकारी (श्रेणी-3, वर्ग-3) या सर्व पदांच्या याद्या माध्यमनिहाय प्रसिद्ध करणे.

वरील मागण्या दि.३१ मार्च २०२५ पर्यंत मान्य न झाल्यामुळे,०१ एप्रिल २०२५ पासून बेमुदत साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे.शिक्षक संघटनांनी प्रशासनाने यावर तत्काळ कार्यवाही करावी,अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

यावेळी महेंद्र वेरुळकर,पुंडलिक रेकलवार,महेश सोनेकर,देवराव डेबरे,विकास दरणे,नरेंद्र परोपटे, पुंडलीक बुटले, गजानन पोयाम,आसाराम चव्हाण, मो.रफिक,सय्यद शेरू,महेश खोडके,राजेश उरकुडे,मनीष लढी, युवराज पत्रे,रुपेश हिवरकर, देवेंद्र ठाकरे चंद्रशेखर उम्रतकार,अरुण मेश्राम, अरुण महल्ले,शरद घरोड,तुषार आत्राम,सुनील राठोड,शशिकांत खडसे,विकास झाडे,महेश शिरभाते,संजय पांडे, विनोद डाखोरे,मुकेश भोयर,लक्ष्मण काटकर,किरण मानकर,विठ्ठल थेटे प्रकाश सालपे, विकास झाडे उपस्थित होते.

## श्री स्वामी समर्थांच्या प्रकट दिनानिमित मधु ताराचे भव्य मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**

दिनांक.31 मार्च 2025 रोजी स्वामी समर्थांच्या कृपा आशीर्वादाने मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने स्वामी समर्थ सेवा परिवार मंदिर साडेसतरा नळी हडपसर पुणे येथे भव्य मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर पार पडले.

मधु तारा प्रमुख श्री नितीनजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर घेण्यात आले.मधु तारा पुणे जिल्हा प्रमुख श्री अनिलजी दांगडे यांनी नियोजन केले.




स्वामी समर्थ सेवा परिवाराचे प्रमुख श्री घनश्याम दादा जगताप यांनी आणि सेवा परिवाराच्या सर्व पदाधिकारी यांनी शिबिराचे उत्तम नियोजन केले.

पुण्यातील राज्यात प्रसिद्ध असणारे एच.व्हि. देसाई नेत्र रुग्णालय यांच्या सहकार्याने हे शिबिर पार पडले.

स्वामींच्या प्रकट दिनानिमित हजारो भक्तांनी या शिबिराचा लाभ घेतला तसेच असंख्य वृद्ध माता बंधू भगिनींचे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया साठी नावे रजिस्टर करण्यात आली. या शिबिराला H V देसाई हॉस्पिटलचे श्री दिनेश सर. श्री प्रसाद सर.साडेसतरा नळी ग्रामपंचायत सदस्य श्री महेश दादा तुपे.K V 2 कंपनीचे मालक श्री धीरजजी लोहार.वेलेंटिना कंपनीचे डायरेक्टर श्री शशिकांतजी जगताप.रूपाली ताई कवडे.जगद्गुरु श्री नरेंद्र नाथ महाराजांच्या संप्रदायातील भक्त गण तसेच असंख्य मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी मधु तारा पुणे शहराध्यक्षा म्हणून श्रीमती शारदाताई शेंडकर यांची नियुक्ती करण्यात आली. नियुक्ती पत्र मधु तारा प्रमुख.श्री दिनेश सर.श्री जगताप दादा.श्री धीरज सर.श्री दांगडे सर यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी डॉक्टर्स आणि टेक्निशियन टीमने खूपच छान प्रतिसाद दिला.

या वेळी स्वामी समर्थांच्या आशीर्वादाने आणि आपल्या सर्वांच्या सहकार्याने ही मानव सेवा रुग्ण सेवा अखंडित घडत राहो असे मधु तारा प्रमुख श्री नितीनजी शिंदे म्हणाले.

### एप्रिल फुल

पाच वर्षाने
देतात हुल
जनता बनते
एप्रिल फुल

थापेबाजी
आश्वासने
भुलतात
सारी मने

लाडक्या योजना
पंधरा लाख
तिजोऱ्या
झाल्या खाक

निपटून सारा
भ्रष्टाचार
म्हणे आम्ही
करू कारभार

ज्यांच्या वरती
डागल्या तोफा
पक्षात येताच
विरल्या वाफा

"खतरेमे" ची
दिली हुल
जनता झाली
एप्रिल फुल.

नाविन्य इथे
उरले कुणा
एप्रिल फुल
रोजच म्हणा

**श्रीनिवास गडकरी**



# संविधानाने नागरिकांना मानवी मूल्य आणि प्रतिष्ठा दिली

## सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांचे प्रतिपादन

**छत्रपती संभाजीनगर :** आपले संविधान कालसुसंगत राहील का, अशी टीका आपल्या संविधानावर होते. मात्र, आज ७५ वर्षानंतरही भारतीय संविधान कालसुसंगत असून ते आपल्याला मार्गदर्शक आहे. भारतीय संविधानाने या देशातील नागरिकांना मानवी मूल्य आणि प्रतिष्ठा दिली असल्याचे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांनी यावेळी केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या वतीने संविधान महोत्सवाचा उद्‌घाटन सोहळा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी रुक्मिणी सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी, महात्मा गांधी मिशनचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, सचिव अंकुशराव कदम, विश्वस्त डॉ.अमरदीप कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, ॲड.एस.के.कदम, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

न्यायमूर्ती प्रसन्न वराळे म्हणाले, संविधानाची उद्देशिका हा संविधानाचा आत्मा असून उद्देशिकेचा प्रत्येक शब्द महत्त्वपूर्ण आहे. उद्देशिकेचे महत्त्व अनेक विचारवंतांनी सांगितलेले आहे. या उद्देशिकेचा सार्थ गौरव प्रख्यात प्राध्यापक अर्नेस्ट यांनी आपल्या 'फिलासॉफी ऑफ पॉलिटिकल सायन्स' हा ग्रंथात केला आहे. या ग्रंथाची अर्पणपत्रिका त्यांनी भारतीय संविधानात दिलेली आहे. आपण सगळे नेहमी संविधानाच्या ज्या प्राविधानाविषयी कायम बोलत असतो ती म्हणजे, नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि राज्याची मार्गदर्शक तत्त्वे होय. नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा प्रश्न जेव्हा आला तेव्हा हेही प्रावधान केले गेले की, मूलभूत अधिकारांची रक्षा आणि जतन करणे ही उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाची जबाबदारी राहील.

### ‘संविधानाचा अधिक्षेप करण्याची ताकद कोणात नाही’

या संविधानाचा अधिक्षेप करण्याची ताकद कोणात नाही. मागे इतिहासात आपण पाहिले, जेव्हा कोणी सत्ता केंद्रित करण्याचा प्रयत्न केला किंवा सत्तेचा वापर गैरमार्गाने करण्याचा प्रयत्न केला किंवा संविधानात बदल करण्याचा प्रयत्न केला अशा सर्व शक्तींना या देशातील नागरिकांनी ज्यांनी हे संविधान स्वत:ला समर्पित केलेले आहे. त्या सर्व जबाबदार नागरिकांनी अशा सर्व शक्तींना सत्तेतून बाजूला केलेले आहे.

### बॅरिस्टर राजा एस. भोसले चेअर ऑफ लीगल स्टडीज अँड रिसर्चची स्थापना

एमजीएम विद्यापीठात ‘बॅरिस्टर राजा एस भोसले चेअर ऑफ लीगल स्टडीज अँड रिसर्च’चे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्‌घाटन करण्यात आले. भारतातील बदलत्या कायदेशीर व्यवस्थेच्या अनुषंगाने सखोल संशोधन आणि धोरण निर्मितीला चालना देण्यासाठी ही चेअर महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. या चेअरचा उद्देश विविध कायदेशीर क्षेत्रांमध्ये संशोधन करणे, सार्वजनिक धोरणांवर प्रभाव टाकणे, आणि संशोधक व विधी अभ्यासकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे हा आहे. संविधानिक कायदा, मानवाधिकार, पर्यावरण कायदे आणि बौद्धिक संपदा कायदा या क्षेत्रांवर विशेष भर दिला जाणार आहे.

ज्या काही मोजक्या संस्था आपल्या संख्यात्मक वाढीसह गुणात्मक वाढीचा जाणीवपूर्वक प्रयत्न करतात यात एमजीएम संस्थेचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. भगवान बुद्धांचा ‘अत्त दीप भव’ हा विचार घेऊन आपली संस्था कार्यरत आहे. संस्थेने पारंपरिक उपक्रमांसह विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हावेत म्हणून कालसुसंगत असे अभ्यासक्रम आणि उपक्रम सुरू केले असल्याचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांनी यावेळी सांगितले.

आजच्या कार्यक्रमाची सुरूवात संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून करण्यात आली. एमजीएम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी संविधान डायरी आणि प्रदर्शन येथे भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलगुरू डॉ.विलास सपकाळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिव कदम यांनी केले तर आभार प्रा. झरताब अंसारी यांनी मानले.

# जामनेर तालुक्यात शेततळ्याद्वारे शेतकरी स्वावलंबी होणार

## जलसंपदा मंत्री गिरीश महाजन



**जळगाव :** जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यात शेतीला शाश्वत सिंचनाचा आधार मिळावा आणि तालुक्यातील सर्व जमीन पाणीदार होण्यासाठी तालुक्यात २०२० शेततळे बनवण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले आहे. तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्याला मुबलक पाणी मिळावे, शेती वाढावी आणि त्याचे उत्पादन दुप्पट व्हावे, हा या प्रकल्पा मागील मुख्य उद्देश आहे. शेततळे हा शाश्वत सिंचनाचा उत्तम पर्याय असून, त्याद्वारे शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवता येईल, असे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी जामनेर तालुक्यात गोंडखेड येथे भव्य शेतकरी मेळाव्यात बोलतांना सांगितले

जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या पुढाकाराने गोंडखेड येथे भव्य शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला. या वेळी त्यांनी तालुक्यात राज्य आणि देशात नवा आदर्श निर्माण करणाऱ्या जलसंधारण प्रकल्पाची घोषणा केली या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात तालुक्यातील २८ गावांमध्ये २०२० शेततळ्यांची निर्मिती करण्याचे नियोजन आहे. यासाठी राज्य शासनाचा निधी उपलब्ध होणार आहे. गोंडखेड शिवारातील शेतकरी मेळाव्यात सुक्ष्मसिंचन शेतीसोबतच जोडधंदे म्हणून पशुपालन, मस्यपालन, फळशेती तसेच शेततळे परिसरात सोलर पॅनलद्वारे वीज निर्मिती याबाबतही माहिती देण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पन्नाच्या संधी मिळणार आहेत.

जामनेर तालुका केवळ सिंचनच नाही, तर सर्वच क्षेत्रांमध्ये राज्यात पहिल्या क्रमांकावर जात्रा, असे आपले स्वप्न असल्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी या मेळाव्यात बोलतांना सांगितले.. या महत्त्वाकांक्षी जलसंधारण योजनेमुळे भविष्यात जामनेर तालुका कृषी क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवून आणेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### संस्मरणीय कविसंमेलन




**छत्रपती संभाजीनगर येथील मिलिंद महाविद्यालयाच्या लुंबिनी उद्यानात नागसेन फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते. या फेस्टिव्हलचा समारोप बहुभाषिक कविसंमेलनाने झाला. "श्वास मी सोडेन घेणे एकदाचा, रक्तात भीम माझ्या मी बंडखोर आहे..." या आणि अशा अनेक विद्रोही कवितांनी उपस्थित श्रोत्यांच्या अंगावर अक्षरशः रोमांच उभे केले. रविवारची ही सायंकाळ सर्वांच्या कायम स्मरणात राहणारी ठरली.**

# तारळी धरणातील राखीव २.७० टीएमसी पाणी सोडण्याची मागणी



**कराड :** राज्य शासनाच्या ११ मार्च २००४ च्या आदेशानुसार व कृष्णा कालवा पाणी लवादाच्या निर्णयानुसार कराड जवळील कृष्णा नदीवरील खोडशी बंधाऱ्यासाठी पाटण तालुक्यातील तारळी,वाई तालुक्यातील धोम व सातारा तालुक्यातील कण्हेर धरणांतून कराड तालुक्यासह शेजारच्या सांगली जिल्ह्यातील वाळवा, पलूस तालुक्यातील शेतकऱ्यांना वरदान असलेल्या येथील कृष्णा कालव्यासाठी २.७० टीएमसी पाणी आरक्षित ठेवले आहे. कृष्णा कालव्यासाठी पाणी आवर्तन कोणत्या धरणातून राखीव आहे हे निश्चित करा व मंत्रालयात होणाऱ्या उन्हाळी कलवा सल्लागार बैठकीत त्याबाबतचा निर्णय होऊन त्याची चालू उन्हाळ्यात तात्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

वाढत्या राजकीय हस्तक्षेपांसह कुरघोडीच्या राजकारणामुळे मागील दोन वर्षांपासून पाटण तालुक्यातील तारळी धरणातून तारळी नदीत व पुढे उंब्रज येथे कृष्णा नदीमध्ये पाणी सोडणे थांबवले आहे. त्यामुळे खोडशी धरणात पाणी साठणे बंद होऊन कृष्णा कालव्यद्वारे सिंचन खंडित झाले आहे. त्याचा थेट फटका ऊस, द्राक्ष व रब्बी हंगामातील पिकांना बसत आहे.कराडसह शेजारच्या सांगली जिल्ह्यातील वाळवा, पलूस तालुक्यांतून जाणाऱ्या ८६ कि.मी.लांबीचा कालवा सातारा व सांगली जिल्ह्यांतील ६० गावांच्यातील हजारो शेतकऱ्यांच्या १३ हजार ३६६ हेक्टरला सिंचन देतो. त्याचा शासनाला प्रतिवर्षी ६ ते ७ कोटी रुपये महसूलही मिळतो.

मात्र सध्या कडक उन्हाळा सुरू झाल्याने उन्हाळी हंगामातील पिकांना पाण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. परंतु खोडशी धरणात पाणी साठा होत नसल्याने कृष्णा कालवा कोरडा ठणठणीत पडला आहे. सदर पाणी टंचाईमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेकांची पिके कोमेजत चालली आहेत. पाण्याचा अधिकार असूनही प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याने लाभधारक शेतकऱ्यांत संताप उसळला आहे. प्रशासनाने तत्काळ निर्णय न घेतल्यास, आम्ही शेतकरी रस्त्यावर उतरू,असा इशाराही लाभधारक शेतकऱ्यांनी दिला आहे.

तारळी धरणातील राखीव २.७० टीएमसी पाणी तातडीने कृष्णा नदीतून खोडशी बंधाऱ्यात व तेथून कृष्णा कालव्यात सोडावे,याची नियमित आवर्तने सुरू ठेवावीत. पाणीपुरवठा तत्काळ सुरू झाला नाही आणि शेतकऱ्यांचा पाण्याचा हक्क नाकारला तर तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही या शेतकऱ्यांनी निवेदनात दिला आहे.

### ईदगाह मैदानात तरुणावर कोयत्याने वार

**कराड :** कराड येथील ईदगाह मैदानावर गप्पा मारत बसलेल्या एका तरुणावर पाच जणांच्या टोळक्याकडून जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात संबंधित युवक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर येथील कृष्णा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.शुभम कट्टीमनी असे हल्ला झालेल्या तरुणाचे नाव आहे.

२९ मार्च रोजी शुभम येथील ईदगाह मैदानात बसला होता. यावेळी स्कॉर्पिओ गाडीतून पाच जण आले. त्यांनी गप्पा मारत बसलेल्या शुभम याला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यावेळी शुभमने त्यांना समजवण्याचा प्रयत्न केला मात्र, त्या पाच जणांनी शुभमवर चाकू आणि कोयत्याने वार केले. दरम्यान, सदर पाच जणांना पकडण्यात पोलीसांना यश येऊन पोलिसांनी पाचही जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

# शासकीय बांधकाम ठेकेदाराच्या खुनाच्या आरोपीला ‘मकोका’

**पुणे:** शासकीय बांधकाम ठेकेदार विठ्ठल पोळेकर यांचे अपहरण करून दोन कोटी रुपयांच्या खंडणीसाठी निर्घृण खून करण्यात आल्याचा प्रकार घडला होता. या खून प्रकरणात मुख्य गुन्हेगार योगेश उर्फ बाबू भामे याच्यासह साथीदार आरोपी विरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्याचे आदेश पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिले.

योगेश उर्फ बाबू किसन भामे (वय ३२), रोहित उर्फ बाळा किसन भामे (वय २२, दोघे रा. डोणजे, सिंहगड पायथा, ता. हवेली), शुभम पोपट सोनवणे (वय २४, सध्या रा. नगर रस्ता, मूळ रा. खळवाडी, चिंचोली गुरव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर), मिलिंद देवीदास थोरात (वय २४, सध्या रा. वाघोली, नगर रस्ता, मूळ रा. बेलगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर), रामदास दामोदर पोळेकर (वय ३२, रा. पोळेकरवाडी, डोणजे, सिंहगड पायथा, ता. हवेली) अशी ‘मकोका’ कारवाई केलेल्या आरोपीची नावे आहेत.

शासकीय बांधकाम ठेकेदार विठ्ठल पोळेकर १४ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी फिरायला निघाले होते. त्यावेळी दबा धरून बसलेल्या आरोपी योगेश भामे आणि त्याच्या साथीदारांनी ठेकेदार पोळेकर यांना धमकावून त्यांचे कार मधून अपहरण केले. त्यांच्यावर धारदार शस्त्राने वार करून खून करत त्यांच्या मृतदेहाचे तुकडे करुन संबंधित तुकडे हे खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात फेकून दिले होते.

आरोपी योगेश भामे आणि साथीदारांनी सिंहगड रस्ता, डोणजे, खडकवासला परिसरात गंभीर गुन्हे केले होते. त्यांनी ठेकेदार विठ्ठल पोळेकर यांच्याकडे दोन कोटीं रुपयांची खंडणी मागितली होती. पोळेकर यांच्याकडून रस्त्याचे काम करण्यात येत होते. भामे याने रस्त्याच्या कामात अडथळा आणण्याची धमकी दिली होती, तसेच भामे याने पोळेकर यांच्याकडे आलिशान कार मागितली होती. खंडणी देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी त्यांचे अपहरण करून निर्घृण खून केला. याप्रकरणाचा तपास ग्रामीण गुन्हे शाखा, तसेच हवेली पोलिसांनी केला होता.

# महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेत राजवर्धन रजनी बाळू उगले बीड जिल्ह्यात द्वितीय तर राज्यात तेरावा

## बंटी उगलमुगले सर यांच्या विद्यार्थीची सलग चौथ्या वर्षी चमक

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**

– नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षे मध्ये कोणत्याही गैरप्रकारला बळी न जाता, मेहेनत व अभ्यासाच्या जीवावर राजवर्धन उगले इयत्ता सहावी न्यू स्वामी समर्थ इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी ने बंटी उगलमुगले सर यांच्या मार्गदर्शनाखाली, राज्यात तेरावा क्रमांक पटकवला आहे. प्रत्येक वर्षी शिरूर तालुक्यातील विद्यार्थी जिल्ह्याच्या यादीमध्ये दिसत होती. बंटी सरांचे विद्यार्थी महाराष्ट्राच्या यादीमध्ये यावेत हे त्यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करून दाखवले. या वर्षी महाराष्ट्रच्या यादीमध्ये सुध्दा विद्यार्थांनी नावलौकीक मिळवले आहे. राजवर्धन उगले या विद्यार्थ्यांचे न्यू स्वामी समर्थ इंग्लिश स्कूलचे संचालक डॉ.राजेश तांदळे, मुख्याध्यापक मोहिनी तांदळे, ढवळे सर, उगलमुगले सर तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



### खोडाळा येथे रमझान ईद उत्साहात साजरी

**मोखाडा :** मुस्लीम बांधवांच्या पवित्र रमझान पर्वाची रविवारी सायंकाळी चंद्रदर्शनाने सांगता झाल्यानंतर सोमवारी सर्वत्र ईद-उल-फित्र अर्थात रमझान ईद साजरी करण्यात आली आहे. खोडाळा शहरातील ईदगाह मैदानावर सकाळी १० वाजता पारंपरिक पद्धतीने सामूहिक नमाजपठण करण्यात आले. त्यानंतर मुस्लिम बांधवांनी ईदच्या शुभेच्छा दिल्या.

### कर्जत-खोपोली लोकल गाड्या वाढविण्यासाठी महेंद्र थोरवे यांचा पुढाकार



**कर्जत :** कर्जत-खोपोली दरम्यान संध्याकाळच्या वेळेत लोकल गाड्या उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांना होणाऱ्या अडचणींबाबत सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांनी आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेतली. संध्याकाळच्या सुमारास अडीच तास खोपोली कडे जाण्यासाठी लोकल नाही. या दरम्यान लोकल वाढविण्याची मागणी केली.

खोपोलीला जाण्यासाठी संध्याकाळी ५:११ नंतर थेट ७:२८ वाजता लोकल उपलब्ध असल्याने तब्बल अडीच तास प्रतीक्षा करावी लागत आहे. पंकज ओसवाल यांनी याबाबतची माहिती आमदार थोरवे यांना दिली. या विषयाची गंभीर दखल घेत आमदार महेंद्र थोरवे यांनी तत्काळ रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले असून, लवकरच मध्यरेल्वेच्या म ह ाव्य व स्थ ाप क ंच्य ा कार्यालयात निवेदन देण्यात येणार आहे.

स्थानकांवरील गर्दी, चाकरमानी आणि प्रवाशांच्या सोयीसाठी संध्याकाळच्या वेळेत अधिक लोकल सुरू करण्यासाठी थोरवे आग्रही आहेत. याप्रसंगी रेल्वे प्रशासनाला सर्व मागण्यांवर लक्ष केंद्रित करून योग्य तो पाठपुरावा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कर्जत - खोपोली प्रवाशांना अधिक सुविधा मिळाव्यात. यासाठी थोरवे सातत्याने प्रयत्नशील आहेत. संध्याकाळच्या वेळेत अधिक लोकल सेवा उपलब्ध होण्यासाठी लवकरच सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त करण्यात आला आहे.

### महिला प्रकाशकांच्या यशोगाथा प्रेरणादायी : प्रा. डॉ. भास्कर ढोके

# ‘गुटेनबर्गच्या सावल्या’ पुस्तकात महिलांचे योगदान शब्दबद्ध

**नाशिक :** भारतीय प्रकाशन विश्वात स्त्रियांचं आगमन उशिरा झाले असले तरी त्यांनी अतिशय उल्लेखनीय असे काम केले आहे आणि करीत आहेत. अशा कर्तृत्ववान महिला प्रकाशकांच्या यशोगाथा प्रा. डॉ . प्रवीण घोडेस्वार यांनी आपल्या 'गुटेनबर्गच्या सावल्या' या पुस्तकातून शब्दबद्ध केल्या आहेत. स्त्री चळवळीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हा ग्रंथ प्रसिद्ध होणे, ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे, असे प्रतिपादन मराठा विद्याप्रसारक समाजाचे शिक्षण अधिकारी आणि समीक्षक प्रा. डॉ. भास्कर ढोके यांनी केले. संस्थेच्या समाजकार्य महाविद्यालयात प्रा. डॉ. घोडेस्वार यांच्या पुस्तक प्रकाशनाचा सोहळा संपन्न झाला.




या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख, पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य आणि कवयत्री सुरेखा बोऱ्हाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी बोलताना डॉ. देशमुख म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच अवांतर वाचन करण्याची गरज आहे. वाचनाने व्यक्तिमत्त्व समृद्ध होते. या पुस्तकातून अनेक महिला प्रकाशकांचे कार्य वाचकांसमोर आणणे, ही महत्वपूर्ण बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सागर वैद्य यांनी भारतातील मुद्रण कलेचा विकासाबाबत तसेच दैनंदिन वृत्तपत्रांच्या छपाईबाबत पत्रकारितेतला स्वतःचे विविध अनुभव सांगितले. या पुस्तकातून चितारलेल्या भारतातील आणि राज्यातील महिला प्रकाशकांच्या यशस्वी कहाण्या स्त्री सक्षमीकरणाचे प्रतीक असल्याचे मत वैद्य यांनी व्यक्त केले. मुद्रण व्यवसायात स्त्रियांना येणाऱ्या अनेक समस्या व अडचणींवर मात करून या महिला प्रकाशकांनी आपला ठसा उमटविला आहे. त्यांचे काम या क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या नवीन मुली-स्त्रियांना दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरेल, असा आशावाद सुरेखा बोऱ्हाडे यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मनिषा शुक्ल यांनी केले. प्रा. डॉ. सोनल बैरागी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.तर आभार प्रदर्शन डॉ. प्रतिमा पवार यांनी केले. नारायण गबाले, शुभम भालेराव, दीपक जाधव, प्रसाद भोर, पियुषा सुरवाडे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने समाजकार्याचे विद्यार्थी आणि प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

### स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्त्री लेखिकांचे योगदान

ग्रंथ लेखन, ग्रंथ निर्मिती आणि एकुणच ग्रंथ व्यवहारात पुरुषांचे प्राबल्य व वर्चस्व दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून साहित्यिक म्हणून भारतातील सर्व भाषक स्त्री लेखिका, कवयत्रींनी बहुमोल योगदान दिलेले असले तरी प्रकाशक म्हणून स्त्रिया अलीकडच्या दशकांमध्ये या क्षेत्रात आल्या आहेत, असे ढोके यांनी नमूद केले.